मूळ संस्कृत श्लोकांसह

मराठी अनुवाद

श्रीपाद काळे

ऋग्वेद

भाग १८



पंचम मंडलम्

चतुर्थ खंड

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

॥ऋग्वेद संहिता॥

भाग १८

पंचम मंडलम्

चतुर्थ खंड

सूक्त ६७ ते ८७

मूळ संस्कृत + मराठी

मराठी अनुवाद – **श्री. श्रीपाद काळे**

सहाय्य- **डॉ. हेमंत विंझे**

सौ. आशा कऱ्हाडे

॥ऋग्वेद संहिता॥

भाग १८

पंचम मंडलम् (चतुर्थ खंड)

सूक्त ६७ ते ८७

लेखक: श्री. श्रीपाद काळे

भ्रमण ध्वनि नंबर 9869447431

ईमेल shripadykale@ gmail.com

सहाय्य-

डॉ. हेमंत विंझे -drvinze@gmail.com

सौ. आशा कऱ्हाडे- ashakarhade@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : ९ ऑक्टोबर २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अनुवादक टीम परिचय

प्रा. श्रीपाद काळे, मुंबईतील विल्सन महाविद्यालयात १९७७ सालापासून फिजिक्स विषय शिकवत होते. २००८ सेवा निवृत्ती स्वीकारून मुंबईतील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात स्वेच्छेने अनेक लोकोपयोगी कामे करत आहेत. नोकरीच्या काळामध्ये शिक्षकांना सेवा प्रशिक्षण, ऑलंपियाड सारख्या परीक्षांचे आयोजन करत होते. विद्यार्थ्यांसाठी फिजिक्स विषयाची गोडी लावण्यासाठी प्रयोग केले.

डॉ. हेमंत विंझे अनेक वर्षे सर्जन म्हणून कार्यरत होते. विज्ञानावरील त्यांच्या पुस्तकांना राष्ट्रीय पारितोषिके मिळाली आहेत. त्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यांना बेस्ट सिटीजन ऑफ इंडिया हे इंटरनॅशनल पब्लिशिंग हाऊस यांचे पारितोषिक सुद्धा मिळाले आहे.

सौ. आशा गोपाळकृष्ण कऱ्हाडे. (एम्. ए. संस्कृत.)आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना संस्कृत विषयासाठी मार्गदर्शन.Karhade channel या you tubeचॅनल वर रामरक्षा, अथर्वशीर्ष, विष्णु सहस्रनाम अशा अनेक सुप्रसिद्ध स्तोत्रांवर निरुपण केलेले आहे.

पहिल्या मंडलाचे मनोगत

मी प्रा. श्रीपाद काळे आणि माझे स्नेही डॉ. हेमंत विंझे ह्यांच्यामध्ये अनेक विषयांवर चर्चा होत असते. चर्चेमध्ये आमच्या निदर्शनास आले की वेदांचे मराठीत अनुवाद इंटरनेटच्या जंजाळात नाही. निदान आम्हा दोघांना तरी ते सापडले नाही. काही मराठी पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत.

ऋग्वेद संस्कृत वाङ्मयातील पहिला ग्रंथ आहे. प्राचीन काळापासून ऋग्वेद हा मौखिक स्वरूपात होता. अनेक ऋषींनी वेगवेगळे श्लोक लिहिले. हे श्लोक वेगवेगळ्या देवांसाठी लिहिले. गुरुपरंपरेनुसार हे श्लोक अनेकांनी पाठ केले. या सर्व श्लोकांची काही जणांनी नीट मांडणी केली. ऋग्वेद संहितेच्या २१ शाखा असल्याचा उल्लेख पतञ्जलीने आपल्या व्याकरण महाभाष्यात केला आहे. त्यामध्ये "अश्वलायन", "बाष्कल", "मांडूकेय", "शाकल" व “शांखायन” अशा ऋषींनी केलेल्या श्लोकांच्या मांडण्या प्रसिद्ध होत्या. परंतु काळाच्या ओघात फक्त शाकल ऋषींनी केलेली वर्गवारी शिल्लक राहिली आहे. आज आपण ज्या ऋग्वेदाचे पठण करतो ते शाकलऋषींनी मांडणी केलेले श्लोक आहे. शाकल ऋषींनी केलेल्या मांडणीला “शाकल संहिता” असे संबोधले जाते

शाकल ऋषींनी महत्त्वाचे श्लोक वेगवेगळ्या क्रमवारीने लावले आणि त्यांचे विभाग पाडले. या विभागांना मंडल असे म्हणतात. प्रत्येक मंडलामध्ये ऋषी आणि देवता यांच्याप्रमाणे उपविभाग केले. प्रत्येक उपविभागाला सूक्त म्हणतात. सूक्तातील श्लोकांना ऋचा म्हणतात. सर्व ऋचा या पद्य स्वरूपात आहेत. शाकल ऋषींनी तयार केलेल्या संहिते मध्ये १० मंडले, १०२८ सूक्ते,१०५५२ ऋचा आहेत.

१ जानेवारी २०२५ पासून मी आणि माझे स्नेही ह्यांनी आम्हाला कळेल असे ऋग्वेदातील ऋचांचा अनुवाद करण्यास सुरुवात केली. सुरुवातीला इंटरनेटच्या जगात इंग्रजी आणि हिंदी भाषांतरे मिळाली. मराठी अनुवाद कुठेही मिळत नव्हते. निदान आम्हाला तरी सापडले नाही. अचानक सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी भाषांतरित केलेल्या पुस्तकाची माहिती

मिळाली. अनेक प्रयत्नानंतर १९९६ सालची दुर्मीळ आवृत्ती आम्हाला मिळाली. ऋचांचे अनुवाद करताना आम्ही हिंदीतील डॉक्टर श्री. गंगा सहाय शर्मा, हिंदी ऋग्वेद संहिता सनातन, इंग्रजीतील डॉक्टर श्री.भीमराव सदाशिव कुलकर्णी आणि मराठीतील सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी केलेल्या अनुवादाचा संदर्भ वापरला आहे. सर्व अनुवाद वाचून आम्हा दोघांना जसा अर्थ कळला त्याप्रमाणे सर्वांना कळेल असे ऋचांचे भाषांतर आम्ही करत आहो. काही ऋचांचा अर्थ लावताना आम्हाला खूप वेळ लागला आणि कष्ट करावे लागले. प्रत्येक महिन्यात निदान १५ सूक्ते भाषांतर करावी असा आम्ही संकल्प केला आहे. अनुवाद क्लिष्ट होऊ नये म्हणून आम्ही पाठभेदान्चे विश्लेषण करणे टाळले आहे. एकच पाठ प्रमाण मानला आहे. वाचकाने गैरसमज करून घेऊ नये.

आम्ही केलेला अनुवाद हा लोकांपर्यंत कसा पोहोचवा याच्या विवंचनेत आम्ही दोघंही होतो. त्याच वेळेस लोकांमध्ये साहित्याची आवड निर्माण करण्यासाठी भरीव कामगिरी करणाऱ्या ईसाहित्य प्रतिष्ठानची आठवण झाली.

ई साहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री सुनीळ सामंत ह्यांनी आम्ही केलेल्या पंधरा सुक्ताचा अनुवाद वाचून आम्हाला अनुवाद करण्यास प्रोत्साहन दिले. हा अनुवाद पुस्तक रुपात लोकांपर्यंत पोचवण्याची जबाबदारी श्री सुनीळ सामंत यांनी घेतली.

हा अनुवाद बिनचूक होण्यासाठी सौ आशा कऱ्हाडे यांनी प्रत्येक संस्कृत श्लोक वाचून मराठी व्याकरण आणि अर्थ नीट तपासून पहिला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ऋचांमध्ये सुधारणा करून हा अनुवाद आम्ही तिघेही सादर करत आहोत. हा अनुवाद सगळ्यांना आवडेल आशा आम्ही करतो. तरीही काही त्रुटी आढळल्यास निदर्शनास आणून द्यावे ही विनंती.

श्रीपाद काळे

मनोगत

रविवार दिनांक ३० मार्च २०२५ चैत्र पाडव्यापासून ऋग्वेदातील पहिला भाग ई साहित्य प्रतिष्ठान ह्यांनी प्रकाशित केला. त्यानंतर गेल्या वर्ष अखेरी ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळातील १९१ सूक्ते आणि त्यातील २००६ ऋचाचा अनुवाद ई साहित्य प्रतिष्ठान यांनी ९ भागात प्रकाशित केला. पहिल्या भागातील सर्व १९१ सूक्त एकत्र घेऊन संपूर्ण पहिले मंडल सुद्धा ई साहित्य प्रतिष्ठानी प्रकाशित केले.

पहिले मंडल प्रकाशित करताना अनेक वाचकांनी अमूल्य अभिप्राय कळवला. त्यामुळे पुढील मंडल अनुवादित करण्यास ऊर्जा मिळत आहे

जानेवारी २०२६ पासून दुसऱ्या व तिसऱ्या मंड्लाचे काम पूर्ण केले. ही सर्व सूक्त एकच भागात प्रकाशित करत आहोत.

मे महिन्या पासून चवथे मंडल दोन भागात प्रकाशित करण्याचा संकल्प केला आहे. त्यातील हा पहिला भाग आहे.

श्रीपाद काळे

अनुवाद : श्री.श्रीपाद काळे,

सहाय्य- डॉ. हेमंत विंझे आणि सौ. आशा कऱ्हाडे

संदर्भ : डॉक्टर श्री. गंगा सहाय शर्मा,
डॉक्टर श्री.भीमराव सदाशिव कुलकर्णी,
हिंदी ऋग्वेद संहिता सनातन.
ऋग्वेदाचे मराठी भाषांतर डॉक्टर सिद्धेश्वर शास्त्री चित्राव

ऋग्वेदा बद्दल काही उपयुक्त माहिती

ऋग्वेद हा चार वेदांपैकी एक असून त्याची रचना चार वेदांमध्ये सर्वप्रथम झाली आहे असे समजण्यात येते.

ऋग्वेद संस्कृत वाङ्मयातील पहिला ग्रंथ आहे. प्राचीन काळापासून ऋग्वेद हा मौखिक स्वरूपात होता. अनेक ऋषींनी वेगवेगळे श्लोक लिहिले. हे श्लोक वेगवेगळ्या देवांसाठी लिहिले. गुरु परंपरेनुसार हे श्लोक अनेकांनी पाठ केले. या सर्व श्लोकांची काही जणांनी नीट मांडणी केली. त्यामध्ये "आश्वलायन", "बाष्कल", "मांडूकेय", "शाकल" व शांखायन सारख्या ऋषींनी श्लोकांची मांडणी केली परंतु काळाच्या ओघात फक्त शाकल ऋषींनी केलेली वर्गवारी शिल्लक राहिली आहे आपण ज्या ऋग्वेद पठण करतो ते शाकल ऋषींनी मांडणी केलेले श्लोक आहेत शाकल ऋषींनी केलेल्या मांडणीला शाकल संहिता असे संबोधले जाते

शाकल ऋषींनी महत्त्वाचे श्लोक वेगवेगळ्या क्रमवारीने लावले आणि त्यांचे विभाग पाडले. या विभागांना मंडळ असे म्हणतात. शाकल ऋषींनी श्लोकाची विभागणी केली त्याला मंडळ म्हणतात. मंडळातील प्रत्येक मंडळामध्ये ऋषी आणि देवता यांच्याप्रमाणे उपविभाग केले . प्रत्येक उपविभागाला सूक्त म्हणतात. सूक्तातील श्लोकांना ऋचा म्हणतात . सर्व ऋचा या पद्य स्वरूपाच्या आहेत. शक्कल ऋषींनी तयार केलेल्या ऋग्वेदात १० मंडले, १०२८ सूक्ते, १०५५२ ऋचा आहेत.

श्रीपाद काळे

पंचम मंडलाविषयी

ऋग्वेदाचे पाचवे मंडळ प्रामुख्याने 'अत्री मंडळ' म्हणून ओळखले जाते.

या मंडळाची मराठीत थोडक्यात आणि महत्त्वाची माहिती खालीलप्रमाणे आहे:

एकूण सूक्ते: या मंडळात ८७ सूक्ते (स्तोत्रे) समाविष्ट आहेत. त्यामुळे याचे आपण चार भाग करणार आहोत प्रत्येक भागात २२ सूक्त असतील पाचव्या महिन्यातला पहिला भाग पाठवत आहे

या मंडळातील बहुतांश सूक्तांची रचना महर्षी अत्री आणि त्यांच्या वंशजांनी (उदा. श्यावाश्व, गविष्ठिर, भौम अत्री) केली आहे. त्यामुळे याला 'अत्री मंडळ' म्हणतात

सूर्यग्रहण कथा (सूक्त ५.४०): या मंडळातील ४० व्या सूक्तामध्ये एका ऐतिहासिक खगोलीय घटनेचा उल्लेख येतो. जेव्हा राहु आणि असुर स्वरभानूने सूर्याला आपल्या अंधाराने झाकले (सूर्यग्रहण झाले), तेव्हा महर्षी अत्री यांनी आपल्या मंत्रशक्तीने आणि प्रार्थनेने सूर्याला पुन्हा प्रकाशमान केले, अशी कथा यात आढळते.

श्रीपाद काळे

ऋग्वेदामध्ये अनेक वेळा एकवीस रत्नांचा उल्लेख येतो. आमच्या ऋग्वेदाचा भाग दोन या मधील सूक्त वीस ऋचा सात त्याच्यामध्ये ही एकवीस रत्ने असा उल्लेख. त्याचे स्पष्टीकरण

ऋभूंनी आम्हाला एकवीस रत्ने (श्रेष्ठ वस्तू) द्याव्या. सायणाचार्यांच्या मतानुसार ही एकवीस रत्ने म्हणजे एकवीस यज्ञ होत.

यज्ञाचे मुख्य दोन प्रकार आहेत. श्रौत यज्ञ आणि गृह्य किंवा पाक यज्ञ. श्रौत यज्ञाचे पुन्हा दोन प्रकार आहेत हविर्यज्ञ आणि सोम यज्ञ. या तीनही प्रकारच्या यज्ञांना संस्था (form) म्हणतात. आणि त्यांचे प्रत्येकी सात प्रकार मानले आहेत. म्हणून एकूण एकवीस प्रकार होतात.

हविस्संस्था - अग्न्याधेय, अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, आग्रयण, चातुर्मास्य, निरूढपशुबन्ध, सौत्रामणि

सोम संस्था - अग्निष्टोम, उक्त, षोडशी, अत्यग्निष्टोम, अतिरात्र, अप्तोर्याम, वाजपेय

गृह्य किंवा पाक संस्था - हुतं, अहुत, प्राशित, संस्कार, शूलगव, अष्टका, प्रत्यवरोहण

श्रीपाद काळे

आशिर्वाद



पब्लिक ट्रस्ट रजि. नं. : ए - १३९१

ॐ

श्री स्वामी जगद्गुरु शंकराचार्य पीठ, करवीर

श्री प. प. विद्यानृसिंह भारती स्वामी (एकमेव विश्वस्त)

२२११, डी वॉर्ड, शुक्रवार पेठ, कोल्हापूर ४१६ ००२. फोन नं. : २५४१४५४/२५४०३६२. विश्वावसु वर्षे १९४५

E-mail : peethkarvir@gmail.com | Website : www.shankaracharyakarveer.org

आषाढ शुद्ध १२ सोमवार

दि. ७/७/२०२५

श्री. डॉ. विठ्ठल हेमंत लक्ष्मण

मुंबई.

मो. 7678094624

वीरस्थ देवतेचे उत्तम आइतिथि व आपले नारायण-स्मरण.

आपण ऋग्वेदाचे भाषांतर करत आहात ते ही या वयात, हीच खरी कौतुकास्पद बाब आहे. आम्हाला याचा आनंद तर आहेच शिवाय सुरुवाती आहे.

खरे तर आपण ऑनलाईनरित्या सर्जन. अनेकांची ऑपरेशन करत आपण या या लोकांनी आरोग्य प्राप्ती करून दिली. व या सर्वांच्या सदिच्छा घेतल्या. वृद्धांचे आशीर्वाद ही घेतले. फलीभाव असा झाला की व्यावहारिक निवृत्तीनंतर ही आपण आपल्या आयुष्याचा उत्तरार्ध सत्कर्मी म्हणजे वेदाचे भाषांतर करण्यास लावला. खरं तर ही अत्यंत कठिण गोष्ट आहे. हे आपण अंगीकृत केलेले व्रत आपणास आनंदाच्या शिखरावर घेऊन जाईल. व सर्वांच्या भाषेतील आशीर्वाद खूप आपणास प्राप्त होईल.

यापूर्वी सुद्धा असाच प्रयत्न सुमारे ६० वर्षांपूर्वी कुलकर्णी यांनी यजुर्वेदी लोक. व ऋग्वेद: सम वेदांचे भाषांतर करून ते आमच्या श्रीमंत आबासाहेब देशपांडे बसून (वय ९८ वर्षे) ते अहर्निशपणे भाषांतर करत होते. असो. कदाचित ही संधी गरुडझेप असेल पण आम्हाला माहित कधी नव्हे.

आपणास दीर्घायुरारोग्य प्राप्त होवो हीच वीरस्थ देवतेच्या चरणी प्रार्थना.

पुनश्च एकदा वीरस्थ देवतेचे अनेक आइतिथि व आपले नारायण स्मरण सर्वांस विदित करावे.

महानुग्रहांकित वरीवर्ति

श्री. जगद्गुरु शंकराचार्य.

करवीर पीठ.

कोल्हापूर.

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-६७

ऋषि- - यजत आत्रेय **देवता** मित्र आणि वरुण **छन्द**- अनुष्टुप्

बळित्था देव निष्कृतमादित्या यजतं बृहत् ।
वरुण मित्रार्यमन्वर्षिष्ठं क्षत्रमाशाथे ॥१॥
हे प्रकाशमान पूजनीय अदितीदेवींच्या पुत्रांनो, वरुणदेव, मित्रदेवा आणि अर्यमा ! आपण खरोखरच या महान यज्ञस्थानावर उपस्थित असता. आपण सर्वजण मिळून या जगातील सर्वोच्च साम्राज्यावर राज्य करता. ॥१॥

आ यद्योनिं हिरण्ययं वरुण मित्र सदथः ।
धर्तारा चर्षणीनां यन्तं सुम्नं रिशादसा ॥२॥
शत्रूंचा नाश करणाऱ्या, सर्व मनुष्यजातीचे पालनपोषण व रक्षण करणाऱ्या हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण आपल्या सुवर्णमय आसनावर विराजमान व्हावे आणि आम्हाला भक्तगणांना सुख प्रदान करावे ही विनंती .॥२ ॥

विश्वे हि विश्ववेदसो वरुणो मित्रो अर्यमा ।
व्रता पदेव सश्चिरे पान्ति मर्त्यं रिषः ॥३ ॥
हे मित्रदेवांनो, वरुणदेवांनो आणि अर्यमांनो ! आपण निश्चितपणे सर्वज्ञ आहात. आपण आपापल्या स्थानांवर राहून स्वतःच्या नियमांचे व कर्तव्यांचे अत्यंत दृढतेने पालन करता आणि मर्त्य मानवाचे सर्व प्रकारच्या संकटांपासून व पापांपासून रक्षण करता. ॥३ ॥

ते हि सत्या ऋतस्पृश ऋतावानो जनेजने ।
सुनीथासः सुदानवोंऽहोश्चिदुरुचक्रयः ॥४ ॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण सत्य स्वरूप, सृष्टीच्या नियमांचे पालन आणि रक्षण करणारे आहात. हे उदार देवतांनो ! आपण आम्हा भक्तगणांना सन्मार्ग दाखवता आणि कोणत्याही मोठ्या संकटातून बाहेर काढून प्रगतीचा विस्तीर्ण मार्ग मोकळा करता ॥४ ॥.

को नु वां मित्रास्तुतो वरुणो वा तनूनाम् ।
तत्सु वामेषते मतिरत्रिभ्य एषते मतिः ॥५ ॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपल्या दिव्य स्वरूपाची खरोखर कोण बरे योग्य स्तुती करू शकेल? अत्रीऋषींचे वंशज त्यांची श्रेष्ठ बुद्धी आणि प्रार्थना आपल्या आशीर्वादासाठी आणि कृपेसाठी अर्पण करतात ॥५ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-६८

ऋषि- - यजत आत्रेय **देवता** मित्र आणि वरुण **छन्द**- गायत्री

प्र वो मित्राय गायत वरुणाय विपा गिरा ।
महिक्षत्रावृतं बृहत् ॥१॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! तुम्ही सर्वांनी शुद्ध बुद्धीने मित्रदेवांचे आणि वरुणदेवांचे स्तुतियुक्त स्तोत्रांनी गुणगान करावे. हे दोन्ही देव महान साम्राज्याचे (महिक्षत्रौ) वैश्विक सत्याचे (ऋतचे) रक्षण करणारे आहेत॥१॥

सम्राजा या घृतयोनी मित्रश्चोभा वरुणश्च ।
देवा देवेषु प्रशस्ता ॥२ ॥
हे सम्राट मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण घृताचे उत्पत्तीस्थान आणि सर्व देवतांमध्ये अत्यंत प्रशंसनीय मानले गेले आहात. ॥२ ॥

ता नः शक्तं पार्थिवस्य महो रायो दिव्यस्य ।
महि वां क्षत्रं देवेषु ॥३ ॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण आम्हा भक्तगणांना इहलोकातील आणि दिव्य लोकातील श्रेष्ठ ऐश्वर्य प्रदान करण्यास समर्थ आहात. आपल्या ठायी असलेले क्षात्रतेज महान आहे. ॥३ ॥

ऋतमृतेन सपन्तेषिरं दक्षमाशाते ।
अद्रुहा देवौ वर्धेते ॥४ ॥

हे निष्कपट मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण सृष्टीच्या शाश्वत नियमांचे, सत्याचे पालन करत सामर्थ्याला प्राप्त करत सतत समृद्ध होता. ॥४ ॥

वृष्टिद्यावा रीत्यापेषस्पती दानुमत्याः ।
बृहन्तं गर्तमाशाते ॥५ ॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण आकाशातून पाऊस पाडणारे, पाण्याच्या प्रवाहाचे रक्षण करणारे , दान देण्याची इच्छा असणारे आहात. आपण उच्च स्थानावर विराजमान आहात. ॥५ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-६९

ऋषि- - उरुचक्रि आत्रेय **देवता** मित्र आणि वरुण **छन्द**- त्रिष्टुप्

त्री रोचना वरुण त्रीँरुत द्यून्त्रीणि मित्र धारयथो रजांसि ।
वावृधानावमतिं क्षत्रियस्यानु व्रतं रक्षमाणावजुर्यम् ॥१॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण दोघे, स्वर्गाचे तीन अत्यंत चमकदार प्रकाशमान स्तर (त्री रोचना), दिवसाचे तीन भाग सकाळ, दुपार आणि संध्याकाळ (त्रीन् द्यून्:) संपूर्ण ब्रह्मांडाचे तीन लोक (त्रीणि रजांसि: पृथ्वी, अंतरिक्ष आणि आकाश) ह्या सर्वांचा सांभाळ करता. आपण आपल्या क्षात्र तेजाचे आणि कधीही नष्ट न होणाऱ्या दिव्य व्रताचे रक्षण करता ॥१॥.

इरावतीर्वरुण धेनवो वां मधुमद्वां सिन्धवो मित्र दुह्रे ।
त्रयस्तस्थुर्वृषभासस्तिसृणां धिषणानां रेतोधा वि द्युमन्तः ॥२ ॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपल्या कृपेने दुभत्या गायी मधुर दूध देतात, सर्व नद्या अमृततुल्य जल वाहून आणतात. जीवनशक्ती देणारे, समृद्धी देणारे श्रेष्ठ तीन देव (अग्निदेव, इंद्रदेव आणि सूर्यदेव) तिन्ही लोकांचे(पृथ्वी आकाश आणि अंतरिक्ष किंवा स्वर्ग) स्वामी बनतात. ॥२ ॥

प्रातर्देवीमदितिं जोहवीमि मध्यंदिन उदिता सूर्यस्य ।
राये मित्रावरुणा सर्वतातेळे तोकाय तनयाय शं योः ॥३॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण प्रातःकाळी दिव्यशक्तीस्वरूप अदितीदेवींचे आवाहन करतो. मध्यान्हकाळी सूर्यदेव आकाशात वर आले असताना

समृद्धी आणि ऐश्वर्याच्या प्राप्तीसाठी आम्ही मित्रदेवांची आणि वरुणदेवांची स्तुती करतो. हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आमच्या पुत्र-पौत्रांना सर्व प्रकारचे सुख, शांती लाभू दे आणि संकटांपासून मुक्त राहण्यासाठी आपली प्रार्थना करत आहोत. ॥३

या धर्तारा रजसो रोचनस्योतादित्या दिव्या पार्थिवस्य ।
न वां देवा अमृता आ मिनन्ति व्रतानि मित्रावरुणा ध्रुवाणि ॥४ ॥
अदितीदेवींचे पुत्र, मित्रदेव आणि वरुणदेव , अंतरिक्ष लोक, प्रकाशमान नक्षत्र लोक, आकाश लोक (स्वर्ग) आणि पृथ्वीलोक या सर्वांचा सांभाळ करतात. हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपल्या दोघांच्या अढळ नियमांचे उल्लंघन इतर अमर देवसुद्धा कधीही करत नाहीत.॥४ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-७०

ऋषि- - उरुचक्रि आत्रेय **देवता** मित्र आणि वरुण **छन्द**- गायत्री

पुरूरुणा चिद्ध्यस्त्यवो नूनं वां वरुण ।
मित्र वंसि वां सुमतिम् ॥१॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपल्या दोघांचे रक्षण कार्य खरोखरच अत्यंत स्तुतिपात्र आहे. आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना आपली सुबुद्धी आणि कृपा प्राप्त होऊ द्यावी ही विनंती. ॥१॥

ता वां सम्यगद्रुह्वाणेषमश्याम धायसे । वयं ते रुद्रा स्याम ॥२॥

हे निष्कपट मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपल्या दोघांच्या कृपेने आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना उत्तम अन्न आणि समृद्धी प्राप्त होवो ही विनंती. ॥२ ॥

पातं नो रुद्रा पायुभिरुत त्रायेथां सुत्रात्रा ।
तुर्याम दस्यून्तनूभिः ॥३ ॥

हे दुःखाचे निवारण करणाऱ्या मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपल्या विविध रक्षण करणाऱ्या साधनांनी आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे रक्षण करावे आणि आपल्या उत्तम पालनशक्तीने आमचा उद्धार करावा ही विनंती. आम्ही आमच्या संतती सहाय्याने सर्व हिंसक आणि विध्वंसक शत्रूंवर विजय मिळवू शकू. ॥३ ॥

मा कस्याद्भुतक्रतू यक्षं भुजेमा तनूभिः ।
मा शेषसा मा तनसा ॥४ ॥

हे अद्भुत कर्मे करणाऱ्या मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आमच्या प्राणांसह, आमच्या संततीसह कोणाच्याही क्रोधाचे किंवा अन्यायाचे बळी ठरू नये ही विनंती. आम्हाला सदैव आपला आश्रय मिळो ही विनंती. ॥४ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-७१

ऋषि- - बाहुवृक्त आत्रेय **देवता** मित्र आणि वरुण **छन्द**- गायत्री

आ नो गन्तं रिशादसा वरुण मित्र बर्हणा ।
उपेमं चारुमध्वरम् ॥१॥
शत्रूंचा आणि दुष्ट प्रवृत्तींचा नाश करणाऱ्या, महान सामर्थ्याने युक्त असणाऱ्या हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण आमच्या या सुंदर, पवित्र आणि हिंसारहित यज्ञवेदीवर आगमन करावे ही विनंती. ॥१॥

विश्वस्य हि प्रचेतसा वरुण मित्र राजथः ।
ईशाना पिप्यतं धियः ॥२॥
हे परमज्ञानी मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण दोघे या संपूर्ण विश्वाचे शासक आहात. आपण आमच्या विचारांना समृद्ध करावे ही विनंती. ॥२ ॥

उप नः सुतमा गतं वरुण मित्र दाशुषः ।
अस्य सोमस्य पीतये ॥३॥
हे परमज्ञानी मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आम्ही, यज्ञकर्त्या भक्तगणांनी अर्पण केलेल्या हविष्यान्नाची आहुती आणि सिद्ध केलेला सोमरस प्राशन करण्यासाठी आपण आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. ॥३ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-७२

ऋषि- - बाहुवृक्त आत्रेय **देवता** मित्र आणि वरुण **छन्द**- उष्णिक्

आ मित्रे वरुणे वयं गीर्भिर्जुहुमो अत्रिवत् ।
नि बर्हिषि सदतं सोमपीतये ॥१॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण अत्रिऋषींप्रमाणेच स्तुतियुक्त स्तोत्रांनी आपल्याला आमच्या यज्ञस्थळी येण्याचे आवाहन करत आहोत. आपण दोघेही सोमरस प्राशन करण्यासाठी आमच्या या यज्ञस्थळी दर्भासनावर विराजमान व्हावे ही विनंती. ॥१॥

व्रतेन स्थो ध्रुवक्षेमा धर्मणा यातयज्जना ।
नि बर्हिषि सदतं सोमपीतये ॥२॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण आपल्या व्रताने आणि धर्माचरणाने आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना सन्मार्गाला लावणारे आहात. आपण दोघेही सोमरस प्राशन करण्यासाठी आमच्या या यज्ञस्थळी दर्भासनावर विराजमान व्हावे ही विनंती. ॥२ ॥

मित्रश्च नो वरुणश्च जुषेतां यज्ञमिष्टये ।
नि बर्हिषि सदतां सोमपीतये ॥३ ॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या इच्छित फलप्राप्तीसाठी या यज्ञाचा स्वीकार करावा ही विनंती. आपण दोघेही सोमरस प्राशन करण्यासाठी आमच्या या यज्ञस्थळी दर्भासनावर विराजमान व्हावे ही विनंती. ॥३ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-७३

ऋषि- - पौर आत्रेय **देवता** अश्विनीकुमार **छन्द**- अनुष्टुप्

यदद्य स्थः परावति यदर्वावत्यश्विना ।
यद्वा पुरू पुरुभुजा यदन्तरिक्ष आ गतम् ॥१॥
हे सर्वांचे पालन करणाऱ्या अश्विनीकुमारांनो! आपण दोघे अत्यंत दूरच्या ठिकाणी असाल किंवा अगदी जवळच्या ठिकाणी असाल, अथवा वेगवेगळ्या अनेक लोकांमध्ये असाल किंवा अंतरिक्षामध्ये असाल, आपण जेथे कुठेही असाल, तेथून आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती ॥१॥

इह त्या पुरुभूतमा पुरू दंसांसि बिभ्रता ।
वरस्या याम्यध्रिगू हुवे तुविष्टमा भुजे ॥२॥
अनेकांमध्ये श्रेष्ठ असणाऱ्या आणि अनेक महान पराक्रम करणाऱ्या अश्विनीकुमारांनो ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्याला शरण जातो. ज्याची गती कोणीही रोखू शकत नाही, अशा त्या अत्यंत शक्तिशाली अश्विनीकुमारांना आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आमच्या रक्षणासाठी आमच्या यज्ञस्थळी बोलवतो. ॥२ ॥

ईर्मान्यद्वपुषे वपुश्चक्रं रथस्य येमथुः ।
पर्यन्या नाहुषा युगा मह्ना रजांसि दीयथः ॥३॥
हे दैदीप्यमान सुंदर शरीर धारण करणाऱ्या अश्विनीकुमारांनो ! आपण आपल्या रथाचे अद्भुत चक्र स्वतःच्या नियंत्रणात ठेवता. आपण आपल्या सामर्थ्याने विश्वातील मानवांच्या सर्व पिढ्यांच्या (युगांच्या) भोवती वेगाने संचार करता ॥३ ॥

तदू षु वामेना कृतं विश्वा यद्वामनु ष्टवे ।
नाना जातावरेपसा समस्मे बन्धुमेयथुः ॥४॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपल्या श्रेष्ठ आणि सुंदर शक्तीने जे काही निर्माण केले आहे, ते अत्यंत अद्भुत आहे. हे संपूर्ण विश्व त्या महान कार्याची स्तुती करते. वेगवेगळ्या रूपात जन्माला आलेले आणि दोषरहित जीव आम्हा भक्तगणांच्या कल्याणार्थ बंधुभावाच्या नात्याच्या धाग्यात आपल्यामुळे एकत्र जोडले गेले आहेत. ॥४ ॥

आ यद्वां सूर्या रथं तिष्ठद्रघुष्यदं सदा ।
परि वामरुषा वयो घृणा वरन्त आतपः ॥५॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपल्या वेगाने धावणाऱ्या रथावर सूर्यदेवांची कन्या जेव्हा आरूढ झाली तेव्हा आपल्या आरक्त वर्गीय अश्वांनी अद्भुत प्रकाशाने सर्व जग वेढून टाकले ॥५ ॥

युवोरत्रिश्चिकेतति नरा सुम्नेन चेतसा ।
घर्मं यद्वामरेपसं नासत्यास्ना भुरण्यति ॥६ ॥
हे कधीही असत्य न बोलणाऱ्या अश्विनीकुमारांनो ! जेव्हा अत्रीऋषींनी स्तुतिद्वारे आपल्या तीव्र उष्णतेला कोणतीही इजा होऊ न देता सहजतेने ग्रहण केले, तेव्हा आपल्या कल्याणकारी कृपेची अत्रीऋषींनी जागृत मनाने आपल्या दिव्य सामर्थ्याची जाणीव ठेवली होती. ॥६ ॥

उग्रो वां ककुहो यथिः शृण्वे यामेषु संतनिः ।
यद्वां दंसोभिरश्विनात्रिर्नरावर्वतति ॥७ ॥

हे अश्विनीकुमारानो ! आपला रथ, प्रवासाच्या वेळी सतत गतीमान, अत्यंत महान आणि तेजस्वी आहे, त्याची कीर्ती सर्वत्र ऐकू येते. जेव्हा जेव्हा अत्रिऋषी आपल्या अद्भुत कर्मांचे स्मरण करतात, तेव्हा आपण त्यांच्या रक्षणासाठी धावून येता. ॥७ ॥

मध्व ऊ षु मधूयुवा रुद्रा सिषक्ति पिप्युषी ।
यत्समुद्राति पर्षथः पक्वाः पृक्षो भरन्त वाम् ॥८ ॥
हे मधुर रसाची इच्छा करणाऱ्या अश्विनीकुमारांनो! आपण पुष्टी देणाऱ्या मधुर सोमरसाचा स्वीकार करावा ही विनंती . जेव्हा आपण आम्हा भक्तगणांना संकटांच्या महासागरातून मुक्त करता , तेव्हा भक्तगण आपल्यासाठी उत्तम प्रकारे सिद्ध केलेल्या हविष्यान्नाची आहुती अर्पण करतात. ॥८ ॥

सत्यमिद्वा उ अश्विना युवामाहुर्मयोभुवा ।
ता यामन्यामहूतमा यामन्ना मृळयत्तमा ॥९ ॥
हे अश्विनीकुमारांनो ! भक्तगण आपल्याला सुख देणारे म्हणून संबोधतात हे पूर्ण सत्य आहे. जेव्हा जेव्हा रथातून प्रवास केला जातो तेव्हा तेव्हा प्रवासात सर्वात जास्त सुख प्रदान करणाऱ्या आपल्यालाच सर्वात जास्त बोलावले जाते. ॥९ ॥

इमा ब्रह्माणि वर्धनाश्विभ्यां सन्तु शंतमा ।
या तक्षाम रथाँ इवावोचाम बृहन्नमः ॥१० ॥
हे अश्विनीकुमारांनो ! ज्याप्रमाणे कारागीर कुशलतेने रथ बनवतो, त्याचप्रमाणे आम्ही भक्तगणांनी आपल्या साठी परम शांतता देणारी स्तुतियुक्त स्तोत्रे रचली आहेत. ही स्तोत्रे आपल्यासाठी अत्यंत सुखदायी आणि शांतता देणारी ठरोत ॥१०॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-७४

ऋषि- - पौर आत्रेय **देवता** अश्विनीकुमार **छन्द**- अनुष्टुप्

कूष्ठो देवावश्विनाद्या दिवो मनावसू ।
तच्छ्रवथो वृषण्वसू अत्रिर्वामा विवासति ॥१॥
हे मनामध्ये निवास करणाऱ्या आणि भक्तांवर सुखाचा वर्षाव करणाऱ्या अश्विनीकुमारांनो ! आपण आकाश लोकांमध्ये कुठे आहात ? अत्रिऋषी आपल्याला अत्यंत आदराने बोलावत आहेत. त्यांचे हे आवाहन आपण श्रवण करावे ही विनंती ॥१॥

कुह त्या कुह नु श्रुता दिवि देवा नासत्या ।
कस्मिन्ना यतथो जने को वां नदीनां सचा ॥२ ॥
हे स्वर्गात प्रसिद्ध असलेल्या दिव्य अश्विनीकुमारांनो ! आपण सध्या कुठे आहात? नक्की कुठे आहात?(कुह त्या कुह) आपण सध्या कोणत्या भक्तगणांच्या निवासस्थानी आहात? नदीच्या तीरावर आपली कोण सेवा करत आहे ? ॥२ ॥

कं याथः कं ह गच्छथः कमच्छा युञ्जाथे रथम् ।
कस्य ब्रह्माणि रण्यथो वयं वामुश्मसीष्टये ॥३ ॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपण दोघे नक्की कोणाकडे जात आहात? कोणाच्या दिशेने प्रस्थान करत आहा? आपला रथ कोणाकडे जाण्यासाठी जोडला आहे? कोणाच्या स्तुतियुक्त स्तोत्रांनी आपण प्रसन्न व्हाल ? आम्ही भक्तगण आपल्याला आमच्या यज्ञकार्यासाठी येथे येण्याची तीव्र इच्छा करत आहोत ॥३ ॥

पौरं चिद्ध्युदप्रुतं पौर पौराय जिन्वथः ।
यदीं गृभीततातये सिंहमिव द्रुहस्पदे ॥४ ॥
हे पौर ऋषींनी स्तुती केल्या गेलेल्या अश्विनीकुमारांनो ! ज्याप्रमाणे शूर लोक अरण्यप्रदेशात गर्जना करणाऱ्या सिंहाला हुसकावून लावतात, त्याप्रमाणे आपण यज्ञ करणाऱ्या आणि पावसाची प्रार्थना करणाऱ्या पौर ऋषींच्यासाठी पाण्याने भरलेल्या गर्जणाऱ्या मेघाला प्रेरित करावे ही विनंती ॥४ ॥
सायणाचार्यांनी जलवृष्टी "मेघ' असा अर्थ पौर म्हणून दिला आहे

प्र च्यवानाज्जुजुरुषो वव्रिमत्कं न मुञ्चथः । यु
वा यदी कृथः पुनरा काममृण्वे वध्वः ॥५ ॥
हे अश्विनीकुमारांनो ! जेव्हा आपण म्हातारपणाने अत्यंत जर्जर झालेल्या च्यवन ऋषींच्या शरीरावरील जीर्ण त्वचा, एखाद्या जुन्या कपड्याप्रमाणे किंवा कवचाप्रमाणे पूर्णपणे काढून टाकली आणि जेव्हा आपण त्यांना पुन्हा एकदा तरुण बनवले, तेव्हा च्यवन ऋषी नववधूंच्या मनात पुन्हा एकदा प्रेमाची इच्छा जागृत करणारे आकर्षक बनले.॥५ ॥

अस्ति हि वामिह स्तोता स्मसि वां संदृशि श्रिये ।
नू श्रुतं म आ गतमवोभिर्वाजिनीवसू ॥६ ॥
हे शक्तीने समृद्ध असणाऱ्या (वाजिनीवसू) अश्विनीकुमारांनो ! आपली स्तुती करणारे यज्ञकर्ते भक्तगण येथे उपस्थित आहेत. आम्हा भक्तगणांचे आवाहन ऐकून आमच्या समृद्धीसाठी आपल्या दिव्य रक्षणकर्त्या शक्तींसह यावे ही विनंती. ॥६ ॥

को वामद्य पुरूणामा वव्ने मर्त्यानाम् ।
को विप्रो विप्रवाहसा को यज्ञैर्वाजिनीवसू ॥७ ॥

हे अश्विनीकुमारांनो ! भक्तगणांमध्ये असा कोण आहे जो आपल्याला प्रसन्न करतो? असा कोणता ज्ञानी स्तुतीपाठक आहे, जो स्तुतीचे आवाहन करणाऱ्या यज्ञांद्वारे आणि शक्तीने समृद्ध असणाऱ्या आपल्याला आकर्षित करतो ?॥७ ॥

आ वां रथो रथानां येष्ठो यात्वश्विना ।
पुरू चिदस्मयुस्तिर आङ्गूषो मर्त्येष्वा ॥८ ॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपला रथ सर्व रथांमध्ये सर्वात श्रेष्ठ आणि वेगवान आहे. तो आमच्यावर प्रेम करणारा आहे. आमचे हे स्तुतियुक्त स्तोत्र मर्त्य मानवांमध्ये राहून आपले आवाहन करत आहे. ते स्वीकारून आपला रथ सर्व अडथळे पार करत आमच्याकडे येवो ही विनंती. ॥८ ॥

शमू षु वां मधूयुवास्माकमस्तु चर्कृतिः ।
अर्वाचीना विचेतसा विभिः श्येनेव दीयतम् ॥९ ॥
हे मधुर सोमरसाने आनंदित होणाऱ्या अश्विनीकुमारांनो ! आम्ही भक्तगणांनी वारंवार केलेली स्तुतियुक्त स्तोत्रे भक्तगणांसाठी सुखदायक ठरोत. हे श्रेष्ठ बुद्धी असणाऱ्या अश्विनीकुमारांनो ! वेगाने उडणाऱ्या श्येन पक्ष्याप्रमाणे आम्हा भक्तगणांच्या सन्मुख आपण त्वरित प्रगट व्हावे ही विनंती. ॥९ ॥

अश्विना यद्ध कर्हि चिच्छृण्यातमिमं हवम् ।
वस्वीरू षु वां भुजः पृञ्चन्ति सु वां पृचः ॥१०॥
हे अश्विनीकुमारांनो ! जेव्हा कधीही आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांची आवाहने श्रवण कराल तेव्हा आपल्या संपर्कात येणाऱ्या भक्तगणांना आपली रक्षण करणारी शक्ती पूर्णपणे लाभो ही विनंती ॥१० ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-७५

ऋषि- - अवस्यु आत्रेय **देवता** अश्विनीकुमार **छन्द**- पंक्ति

प्रति प्रियतमं रथं वृषणं वसुवाहनम् ।
स्तोता वामश्विनावृषिः स्तोमेन प्रति भूषति माध्वी मम श्रुतं हवम् ॥१॥

हे मधुर स्वभाव असणाऱ्या अश्विनीकुमारांनो ! आपल्या इच्छा पूर्ण करणाऱ्या आणि सुख वाहून आणणाऱ्या दिव्यरथाचा आम्ही यज्ञकर्ते भक्तगण स्तुतियुक्त स्तोत्रांनी आदर-सत्कार करतो. आपण आमची आवाहने श्रवण करावीत ही विनंती. ॥१॥

अत्यायातमश्विना तिरो विश्वा अहं सना ।
दस्रा हिरण्यवर्तनी सुषुम्ना सिन्धुवाहसा माध्वी मम श्रुतं हवम् ॥२॥

हे अश्विनीकुमारांनो ! आपण अनादि काळापासून चालत आलेल्या सर्व दैनंदिन संकटांना पार करून आम्हा भक्तगणांकडे वेगाने यावे ही विनंती. सुवर्णमय मार्गावरून प्रवास करणाऱ्या, सुख देणाऱ्या, सागरा सारखा अथांग वेग असणाऱ्या आणि मधुर स्वभाव असणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो ! आपण आमची आवाहने श्रवण करावीत ही विनंती. ॥२ ॥

आ नो रत्नानि बिभ्रतावश्विना गच्छतं युवम् ।
रुद्रा हिरण्यवर्तनी जुषाणा वाजिनीवसू माध्वी मम श्रुतं हवम् ॥३॥

सुवर्णरथातून प्रवास करणाऱ्या, दुःखाचा नाश करणाऱ्या, समृद्धी आणि माधुर्याचे स्वामी असणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो ! आपण दिव्यरत्ने परिधान करून आम्हा भक्तगणांकडे यावे ही विनंती . प्रसन्न होऊन, मधुर स्वभाव असणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो ! आपण आमची आवाहने श्रवण करावीत ही विनंती. ॥३ ॥

सुष्टुभो वां वृषण्वसू रथे वाणीच्याहिता ।
उत वां ककुहो मृगः पृक्षः कृणोति वापुषो माध्वी मम श्रुतं हवम् ॥४॥

हे संपत्तीचा वर्षाव करणाऱ्या मधुर स्वभाव
असणाऱ्या अश्विनीकुमारांनो ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांची स्तुती आपल्या रथाला अर्पित केली आहे. आपल्या रथाला, उंच खांदे (ककुहः_ वाशिंड) असलेले वेगवान अश्व तृप्त करणारे रूप धारण करतात. मधुर स्वभाव असणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो ! आपण आमची आवाहने श्रवण करावीत ही विनंती. ॥४ ॥

बोधिन्मनसा रथ्येषिरा हवनश्रुता ।
विभिश्च्यवानमश्विना नि याथो अद्वयाविनं माध्वी मम श्रुतं हवम् ॥५॥

स्तुती ऐकण्यासाठी तत्पर मनाचे , रथावरून वेगाने प्रवास करणारे आणि भक्तांची हाक ऐकणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो! आपण आपल्या शक्तीने निष्कपट च्यवन ऋषींच्या रक्षणासाठी धावून गेलात. मधुर स्वभाव असणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो आपण आमची आवाहने श्रवण करावीत ही विनंती. ॥५ ॥

आ वां नरा मनोयुजोऽश्वासः प्रुषितप्सवः ।

वयो वहन्तु पीतये सह सुम्नेभिरश्विना माध्वी मम श्रुतं हवम् ॥६॥

हे मनाच्या वेगाने चालणारे आणि दवबिंदू उडवत धावणारे, वेगवान अश्व, नेतृत्व करणाऱ्या वीरांना, अश्विनीकुमारांना सोमरस प्राशनासाठी आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांकडे घेऊन येवोत. मधुर स्वभाव असणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो ! आपण आमची आवाहने श्रवण करावीत ही विनंती. ॥६ ॥

अश्विनावेह गच्छतं नासत्या मा वि वेनतम् ।
तिरश्चिदर्यया परि वर्तिर्यातमदाभ्या माध्वी मम श्रुतं हवम् ॥७॥

हे अजिंक्य आणि मधुर आनंद देणाऱ्या अश्विनिकुमारानो ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांकडे दुर्लक्ष करून सोडून जाऊ नका ही विनंती. आपण आमच्या सर्व शत्रूंना बाजूला सारून श्रेष्ठ मार्गाने आमच्या निवासस्थानी यावे ही विनंती. मधुर स्वभाव असणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो ! आपण आमची आवाहने श्रवण करावीत ही विनंती. ॥७ ॥

अस्मिन्यज्ञे अदाभ्या जरितारं शुभस्पती ।
अवस्युमश्विना युवं गृणन्तमुप भूषथो माध्वी मम श्रुतं हवम् ॥८॥

हे अजिंक्य आणि शुभ गोष्टींचे राजे असलेल्या अश्विनीकुमारांनो ! रक्षणाची इच्छा करणाऱ्या आणि आपली स्तुतियुक्त स्तोत्रे गाणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञामध्ये आपण यावे ही विनंती. मधुर स्वभाव असणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो ! आपण आमची आवाहने श्रवण करावीत ही विनंती. ॥८ ॥

अभूदुषा रुशत्पशुराग्निरधाय्यृत्वियः ।
अयोजि वां वृषण्वसू रथो दस्रावमर्त्यो माध्वी मम श्रुतं हवम् ॥९॥

प्रकाशमान किरणांनी युक्त अशी उषादेवता प्रकट झाली आहे. यज्ञवेदीवर अग्निदेवांना प्रदीप्त करण्यात आले आहे. हे धनाचा वर्षाव करणाऱ्या, संकटांचे निवारण करणाऱ्या आणि मधुर गुणांनी युक्त असलेल्या अश्विनीकुमारांनो! आपला अमर रथ सज्ज झाला आहे. मधुर स्वभाव असणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो ! आपण आमची आवाहने श्रवण करावीत ही विनंती. ॥९ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-७६

ऋषि- - अत्रि भौम **देवता** अश्विनीकुमार **छन्द**- त्रिष्टुप्

आ भात्यग्निरुषसामनीकमुद्विप्राणां देवया वाचो अस्थुः ।
अर्वाञ्चा नूनं रथ्येह यातं पीपिवांसमश्विना घर्ममच्छ ॥१॥
उषादेवतेच्या आगमनासोबत अग्निदेव प्रदीप्त झाले आहेत, स्तुती करणारे मंत्रोच्चार करत आहेत. हे रथाचे स्वामी असलेल्या अश्विनीकुमारांनो ! आपण निश्चितपणे आमच्या दिशेने यावे. आपण यज्ञस्थळी ओसंडून वाहणाऱ्या सोमरसाचा स्वीकार करावा ही विनंती ॥१॥

न संस्कृतं प्र मिमीतो गमिष्ठान्ति नूनमश्विनोपस्तुतेह ।
दिवाभिपित्वेऽवसागमिष्ठा प्रत्यवर्तिं दाशुषे शम्भविष्ठा ॥२॥
हे संकटात धावून येणाऱ्या अश्विनीकुमारांनो ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण यज्ञस्थळी आपले आवाहन आणि स्तुती करतो. उत्तम प्रकारे तयार केलेल्या यज्ञाकडे आपण कधीही दुर्लक्ष करत नाही. दिवसाच्या यज्ञाच्या समाप्तीच्या वेळी हविष्यान्नाची आहुती देणाऱ्या भक्ताचे दारिद्र्य आणि दुःख दूर करण्यासाठी यावे ही विनंती. ॥२ ॥

उता यातं संगवे प्रातरह्नो मध्यंदिन उदिता सूर्यस्य ।
दिवा नक्तमवसा शंतमेन नेदानीं पीतिरश्विना ततान ॥३॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपण उषादेवतेच्या आगमना नंतर सूर्यदेवांच्या उदयाच्या वेळी ब्राह्म मुहूर्ताच्या वेळी , गायी एकत्र गोळा करण्याच्या वेळी, प्रातःकाळी, दुपारी, रात्री – अशा कोणत्याही वेळी अत्यंत कल्याणकारी रक्षणासह आम्हा भक्तगणांच्या यज्ञस्थळी यावे

ही विनंती. सोमरस प्राशन करण्यासाठी हा यज्ञ आता सुरू झाला नाही तर आपल्या सतत आवाहन करण्यासाठी हा यज्ञ चालणारा आहे ॥३ ॥

इदं हि वां प्रदिवि स्थानमोक इमे गृहा अश्विनेदं दुरोणम् ।
आ नो दिवो बृहतः पर्वतादाद्भ्यो यातमिषमूर्जं वहन्ता ॥४॥
हे अश्विनीकुमारांनो ! हे यज्ञस्थान निश्चितपणे आपले प्राचीन काळापासूनचे निवासस्थान आहे. हे यज्ञस्थान आपलेच आहे म्हणून आपण आम्हा भक्तगणांसाठी अन्न आणि शक्ती घेऊन स्वर्गातून, मोठ्या पर्वतावरून आणि मेघांच्या जलातून आमच्याकडे यावे ही विनंती ॥४ ॥

समश्विनोरवसा नूतनेन मयोभुवा सुप्रणीती गमेम ।
आ नो रयिं वहतमोत वीराना विश्वान्यमृता सौभगानि ॥५ ॥
हे अश्विनीकुमारांनो ! सुख देणाऱ्या आणि नित्यनूतन अशा आपल्या उत्तम रक्षण करणाऱ्या मार्गदर्शनाने आम्ही भक्तगण सन्मार्गाने इच्छित ध्येय प्राप्त करू शकू. आपण आमच्यासाठी सर्व बाजूंनी ऐश्वर्य, पराक्रमी वीर आणि कधीही नष्ट न होणारे सर्व प्रकारचे सौभाग्य घेऊन यावे ही विनंती. ॥५ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-७७

ऋषि- - अत्रि भौम **देवता** अश्विनीकुमार **छन्द**- त्रिष्टुप्

प्रातर्यावाणा प्रथमा यजध्वं पुरा गृध्रादररुषः पिबातः ।
प्रातर्हि यज्ञमश्विना दधाते प्र शंसन्ति कवयः पूर्वभाजः ॥१॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! सूर्यदेवांच्या आगमनापूर्वी येणाऱ्या अश्विनीकुमारांची तुम्ही पूजा करावी. इतर कोणी लोभी, कंजुष, सोमरस पळवून नेणाऱ्या शत्रूंनी सोमरस पिण्यापूर्वी तुम्ही अश्विनीकुमारांना तो सोमरस प्राशन करण्यासाठी प्रदान करावा. हे अश्विनीकुमारांनो ! आपण पहाटेच्या वेळी यज्ञाचा स्वीकार करता, प्राचीन ऋषी आपली विशेष स्तुती करतात. ॥१॥

प्रातर्यजध्वमश्विना हिनोत न सायमस्ति देवया अजुष्टम् ।
उतान्यो अस्मद्यजते वि चावः पूर्वःपूर्वो यजमानो वनीयान् ॥२॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! आपण सकाळी अश्विनीकुमारांची पूजा करावी आणि त्यांना आहुती अर्पण करावी . संध्याकाळची वेळ देवपूजेसाठी योग्य मानली जात नाही म्हणून अर्पण केलेल्या आहुती देव स्वीकारत नाहीत. अनेक जण देवांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत परंतु जे भक्तगण पहाटे उठून यज्ञ करतात त्यांनाच श्रेष्ठ फळाचा लाभ मिळतो ॥२ ॥ .

हिरण्यत्वङ्मधुवर्णो घृतस्नुः पृक्षो वहन्ना रथो वर्तते वाम् ।
मनोजवा अश्विना वातरंहा येनातियाथो दुरितानि विश्वा ॥३॥

हे अश्विनीकुमारांनो ! आपला सोनेरी रंगाचा, समृद्धीने माखलेला, मनाच्या वेगाने चालणारा रथ भक्तगणांना शक्ती देण्यासाठी अन्न घेऊन येत आहे. या रथावर आरूढ होऊन आपण आम्हा भक्तगणांना सर्व संकटांपासून सुखरूप पार करून नेता. ॥३ ॥

यो भूयिष्ठं नासत्याभ्यां विवेष चनिष्ठं पित्वो ररते विभागे ।
स तोकमस्य पीपरच्छमीभिरनूर्ध्वभासः सदमित्तुतुर्यात् ॥४॥
जे यज्ञकर्ते भक्तगण यज्ञकार्याच्या वेळी अश्विनीकुमारांना भरपूर प्रमाणात तृप्ती दायक हविष्यान्नाची आहुती अर्पण करतात ते भक्तगण त्यांच्या या पवित्र कर्मामुळे कधीही क्षीण न होणाऱ्या अश्विनीकुमारांच्या तेजाने आपल्या पुत्र-पौत्रांचे रक्षण करत सर्व संकटावर यशस्वीपणे मात करतात. ॥४ ॥

समश्विनोरवसा नूतनेन मयोभुवा सुप्रणीती गमेम ।
आ नो रयिं वहतमोत वीराना विश्वान्यमृता सौभगानि ॥५॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण अश्विनीकुमारांच्या नूतन, कल्याणकारी उत्तम मार्गदर्शनाखाली मार्गक्रमण करत राहू. हे अश्विनीकुमारांनो ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना उत्तम धनसंपत्ती, वीर आणि पराक्रमी संतती आणि जगातील सर्व प्रकारची अमर व दैवी सौभाग्ये प्रदान करावीत ही विनंती. ॥५ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-७८

ऋषि- सप्तवध्रि आत्रेय **देवता** अश्विनीकुमार **छन्द**- १-३ऊष्णिक्. ४ त्रिष्टुप्, अनुष्टुप्

अश्विनावेह गच्छतं नासत्या मा वि वेनतम् । हंसाविव पततमा सुताँ उप ॥१॥

हे कधीही असत्य न बोलणाऱ्या (नासत्य) अश्विनीकुमारांनो ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञस्थळी यावे, आमच्याकडे कधीही दुर्लक्ष करू नये ही विनंती. ज्याप्रमाणे दोन हंस पक्षी जलाशयाकडे आनंदाने झेप घेतात, त्याप्रमाणे आपण यज्ञकर्त्या भक्तगणांनी सिद्ध केलेला सोमरस प्राशन करण्यासाठी त्वरित यावे ही विनंती. ॥१॥

अश्विना हरिणाविव गौराविवानु यवसम् । हंसाविव पततमा सुताँ उप ॥२॥

हे अश्विनीकुमारांनो ! ज्याप्रमाणे दोन हरणे किंवा दोन रानगवे चाऱ्याच्या शोधात कुरणाकडे धाव घेतात, किंवा ज्याप्रमाणे दोन हंस पक्षी जलाशयाकडे आनंदाने झेप घेतात, त्याप्रमाणे आपण यज्ञकर्त्या भक्तगणांनी सिद्ध केलेला सोमरस प्राशन करण्यासाठी त्वरित यावे ही विनंती. ॥२ ॥

अश्विना वाजिनीवसू जुषेथां यज्ञमिष्टये । हंसाविव पततमा सुताँ उप ॥३॥

हे अन्न आणि शक्तीचे स्वामी असलेल्या अश्विनीकुमारांनो ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञाच्या पूर्ततेचा स्वीकार करावा ही विनंती. ज्याप्रमाणे दोन हंस पक्षी जलाशयाकडे आनंदाने झेप घेतात,

त्याप्रमाणे आपण यज्ञकर्त्या भक्तगणांनी सिद्ध केलेला सोमरस प्राशन करण्यासाठी त्वरित यावे ही विनंती. ॥३ ॥

अत्रिर्यद्वामवरोहन्नृबीसमजोहवीन्नाधमानेव योषा ।
श्येनस्य चिज्जवसा नूतनेनागच्छतमश्विना शंतमेन ॥४॥
हे अश्विनीकुमारांनो! जेव्हा अत्रीऋषी जळत्या कोळशाच्या अंधाऱ्या खड्ड्यात (ऋबीसम्) अडकले होते, तेव्हा त्यांनी संकटात सापडलेल्या असहाय स्त्रीप्रमाणे अत्यंत व्याकुळतेने आपला धावा केला. त्यांच्या हाकेला ओ देऊन आपण श्येन पक्ष्यासारखे ऊर्जेने युक्त अशा वेगाने सुखकारक रथाने त्यांच्या रक्षणासाठी धावून आलात ॥४ ॥

वि जिहीष्व वनस्पते योनिः सूष्यन्त्या इव ।
श्रुतं मे अश्विना हवं सप्तवध्रिं च मुञ्चतम् ॥५॥
हे अश्विनीकुमारांनो ! ज्याप्रमाणे प्रसव करणाऱ्या स्त्रीचे गर्भद्वार उघडते, त्याचप्रमाणे ही वनस्पती आपण उमलावी . हे अश्विनीकुमारांनो ! सात बंधनांनी बांधलेल्या गर्भाला, सप्तवध्रि ऋषींच्या प्रार्थना ऐकून त्यांना सुखरूपपणे मुक्त करावे. ॥५ ॥

भीताय नाधमानाय ऋषये सप्तवध्रये । मायाभिरश्विना युवं वृक्षं सं च वि चाचथः ॥६ ॥
हे अश्विनीकुमारांनो ! जेव्हा सप्तवध्रि ऋषी झाडाच्या ढोलीत अडकल्यामुळे अत्यंत घाबरले होते आणि रक्षण करण्यासाठी आपली प्रार्थना करत होते, तेव्हा आपण आपल्या अद्भुत शक्तींचा वापर करून त्यांची सुटका केली॥६॥

यथा वातः पुष्करिणीं समिङ्गयति सर्वतः । एवा ते गर्भ एजतु निरैतु दशमास्यः ॥७ ॥
महर्षी सप्तवध्रि आपल्या पत्नीला म्हणतात," ज्याप्रमाणे वारा कमळांच्या सरोवरातील पाण्याला सहजपणे हलवतो, त्याचप्रमाणे हे गर्भावती स्त्री तुझ्या गर्भातील दहा महिन्यांचे पूर्ण वाढ झालेले बाळ सहजपणे हालचाल करो आणि सुखरूपपणे गर्भाशयातून बाहेर येवो" ॥८ ॥

यथा वातो यथा वनं यथा समुद्र एजति । एवा त्वं दशमास्य सहावेहि जरायुणा ॥८ ॥
महर्षी सप्तवध्रि आपल्या पत्नीला म्हणतात, "ज्याप्रमाणे वारा हलतो, ज्याप्रमाणे जंगल वाऱ्याने डोलते आणि ज्याप्रमाणे समुद्र लाटांमुळे गतिमान होतो, त्याप्रमाणे हे दहाव्या महिन्याचे (पूर्ण वाढ झालेले) बाळा, तुझ्या गर्भावेष्टना सह सुखरूपपणे जन्माला येऊन दे" ॥८ ॥

दश मासाञ्छशयानः कुमारो अधि मातरि । निरैतु जीवो अक्षतो जीवो जीवन्त्या अधि ॥९ ॥
महर्षी सप्तवध्रि आपल्या पत्नीला म्हणतात, "आईच्या गर्भाशयात दहा महिने सुखरूप राहणारे हे बालक जिवंत आणि पूर्णपणे, निरोगीपणे बाहेर येवो. हे जिवंत बाळ जिवंत मातेच्या गर्भातून सुखरूप जन्माला येवो" ॥९॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-७९

ऋषि- सप्तश्रवस् आत्रेय **देवता** उषा **छन्द**- पंक्ति

महे नो अद्य बोधयोषो राये दिवित्मती ।
यथा चिन्नो अबोधयः सत्यश्रवसि वाय्ये सुजाते अश्वसूनृते ॥१॥
हे दिव्य प्रकाशाने चमकणाऱ्या, उत्तम कुळात जन्मलेल्या (सुजाते) आणि प्रिय-सत्य वाणी असलेल्या (अश्वसूनृते) अशा उषादेवते ! आपण आम्हाला महान ऐश्वर्य आणि धनाचा लाभ करून देण्यासाठी जागृत करावे ही विनंती. ज्याप्रमाणे आपण पूर्वी 'वाय्य' आणि 'सत्यश्रवस्' नावाच्या ऋषींना (सत्य कीर्ती असणाऱ्यांना) जागृत केले होते, त्याचप्रमाणे आपण आम्हालाही जागृत करावे ही विनंती. ॥१॥

या सुनीथे शौचद्रथे व्यौच्छो दुहितर्दिवः ।
सा व्युच्छ सहीयसि सत्यश्रवसि वाय्ये सुजाते अश्वसूनृते ॥२ ॥
हे उत्तम मार्ग दाखवणाऱ्या, पवित्र रथ असणाऱ्या (शौचद्रथे) आणि आकाशाची कन्या असणाऱ्या उषादेवते ! आपण अंधाराचा नाश करून प्रकट होता. हे स्तुती करण्यास योग्य वाय्य आणि सत्य कीर्ती असणाऱ्या ' सत्यश्रवस् नावाच्या ऋषींना वरदान देणाऱ्या , उत्तम कुळात जन्मलेल्या (सुजाते) आणि प्रिय-सत्य वाणी असलेल्या (अश्वसूनृते) उषादेवते ! आपण आम्हा भक्तगणांवर कृपा करण्यासाठी पुन्हा प्रकट व्हावे ही विनंती. ॥२ ॥

सा नो अद्याभरद्वसुर्व्युच्छा दुहितर्दिवः ।
यो व्यौच्छः सहीयसि सत्यश्रवसि वाय्ये सुजाते अश्वसूनृते ॥३ ॥

हे आकाश कन्ये (दुहिता), सुंदर जन्माच्या आणि मधुर भाषिणी उषादेवते ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचा अंधार दूर करावा ही विनंती. हे स्तुती करण्यास योग्य वाय्य आणि सत्य कीर्ती असणाऱ्या ' सत्यश्रवस् ' नावाच्या ऋषींना वरदान देणाऱ्या , उत्तम कुळात जन्मलेल्या (सुजाते) आणि प्रिय-सत्य वाणी असलेल्या (अश्वसूनृते) उषादेवते ! आपण आम्हा भक्तगणांवर कृपा करण्यासाठी पुन्हा प्रकट व्हावे ही विनंती. ॥३ ॥

अभि ये त्वा विभावरि स्तोमैर्गृणन्ति वह्नयः ।
मघैर्मघोनि सुश्रियो दामन्वन्तः सुरातयः सुजाते अश्वसूनृते ॥४ ॥
हे उत्तम कुळात जन्मलेल्या (सुजाते), प्रिय-सत्य वाणी असलेल्या (अश्वसूनृते,) प्रकाशमान आणि ऐश्वर्यशाली उषादेवते ! जे दानशूर, उदार आणि समृद्धीने युक्त असलेले यज्ञकर्ते भक्तगण चहुबाजूने आपल्या स्तोत्रांचे गायन करत आहेत, त्यांना आपण धन आणि ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. ॥४ ॥

यच्चिद्धि ते गणा इमे छदयन्ति मघत्तये ।
परि चिद्वष्टयो दधुर्ददतो राधो अह्रयं सुजाते अश्वसूनृते ॥५ ॥
हे उत्तम कुळात जन्मलेल्या (सुजाते), प्रिय-सत्य वाणी असलेल्या (अश्वसूनृते,) प्रकाशमान आणि ऐश्वर्यशाली उषादेवते ! आपली स्तुती करणारे, हविष्यान्नाची आहुती अर्पण करणारे यज्ञकर्ते भक्तगण ऐश्वर्य प्राप्तीसाठी आपल्या आगमनाने अत्यंत आनंदित होतात. आपल्या कृपेने समृद्धी प्राप्त करतात ॥५ ॥

ऐषु धा वीरवद्यश उषो मघोनि सूरिषु ।
ये नो राधांस्यह्रया मघवानो अरासत सुजाते अश्वसूनृते ॥६ ॥

हे उत्तम कुळात जन्मलेल्या (सुजाते), प्रिय-सत्य वाणी असलेल्या (अश्वसूनृते,) प्रकाशमान आणि ऐश्वर्यशाली उषादेवते ! जे यज्ञकर्ते भक्तगण मुक्त हस्ते धन दान करतात, अशा स्तोत्रांचे पठण करणाऱ्या भक्तगणांना पराक्रमी पुत्रांनी युक्त ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. ॥६ ॥

तेभ्यो द्युम्नं बृहद्यश उषो मघोन्या वह ।
ये नो राधांस्यश्व्या गव्या भजन्त सूरयः सुजाते अश्वसूनृते ॥७ ॥
हे उत्तम कुळात जन्मलेल्या (सुजाते) , प्रिय-सत्य वाणी असलेल्या (अश्वसूनृते,) प्रकाशमान आणि ऐश्वर्यशाली उषादेवते ! जे उदार यज्ञकर्ते भक्तगण अश्वांचे आणि गायींचे दान करतील त्या सर्वांना आपण महान यश प्रदान करावे ही विनंती. ॥७ ॥

उत नो गोमतीरिष आ वहा दुहितर्दिवः ।
साकं सूर्यस्य रश्मिभिः शुक्रैः शोचद्भिरर्चिभिः सुजाते अश्वसूनृते ॥८ ॥
हे उत्तम कुळात जन्मलेल्या (सुजाते) , प्रिय-सत्य वाणी असलेल्या (अश्वसूनृते,) प्रकाशमान आणि ऐश्वर्यशाली उषादेवते ! आपण सूर्यदेवांच्या त्या शुद्ध, चमकदार आणि प्रकाशमान किरणांसोबत प्रकट व्हावे आणि आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना गायींनी युक्त उत्तम अन्न व समृद्धी घेऊन यावे ही विनंती. ॥८ ॥

व्युच्छा दुहितर्दिवो मा चिरं तनुथा अपः ।
नेत्त्वा स्तेनं यथा रिपुं तपाति सूरो अर्चिषा सुजाते अश्वसूनृते॥९॥

हे उत्तम कुळात जन्मलेल्या (सुजाते) , प्रिय-सत्य वाणी असलेल्या (अश्वसूनृते,) प्रकाशमान आणि ऐश्वर्यशाली उषादेवते !
आपण प्रकाशमान व्हावे ही विनंती . आपल्या प्रकाश पसरवण्याच्या कार्यात अजिबात उशीर करू नका नाहीतर, ज्याप्रमाणे एखाद्या चोराला, शत्रूला शिक्षा दिली जाते, त्याप्रमाणे सूर्यदेव आपल्या प्रखर किरणांनी आपला लोप करतील ॥९॥

एतावद्वेदुषस्त्वं भूयो वा दातुमर्हसि ।
या स्तोतृभ्यो विभावर्युच्छन्ती न प्रमीयसे सुजाते अश्वसूनृते ॥१०॥

हे उत्तम कुळात जन्मलेल्या (सुजाते) , प्रिय-सत्य वाणी असलेल्या (अश्वसूनृते,) प्रकाशमान आणि ऐश्वर्यशाली उषादेवते ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना मागितलेली किंवा न मागितलेली, सर्व प्रकारची संपत्ती द्यावी विनंती . हे देवते , आपल्या यज्ञकर्त्या भक्तगणांचा अंधकार आपण दूर करता आणि त्यांना कधीही काहीही कमी पडून देत नाहीत ॥१० ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-८०

ऋषि- सप्तश्रवस् आत्रेय **देवता** उषा **छन्द**- त्रिष्टुप्

द्युतद्यामानं बृहतीमृतेन ऋतावरीमरुणप्सुं विभातीम् ।
देवीमुषसं स्वरावहन्तीं प्रति विप्रासो मतिभिर्जरन्ते ॥१॥
सत्याच्या मार्गाने चालणाऱ्या, आरक्त वर्णीय, प्रकाशमान मार्ग असलेल्या, सूर्यप्रकाश घेऊन (आवहन्तीम्) येणाऱ्या उषादेवतेचे आगमन होताच बुद्धिमान ऋषी आपल्या सुंदर स्तुतियुक्त स्तोत्रांनी उषादेवतेला वंदन करतात ॥१॥

एषा जनं दर्शता बोधयन्ती सुगान्पथः कृण्वती यात्यग्रे ।
बृहद्रथा बृहती विश्वमिन्वोषा ज्योतिर्यच्छत्यग्रे अह्नाम् ॥२ ॥
सर्वांना दर्शन देणारी आणि लोकांना झोपेतून जागृत करणारी उषादेवता प्रत्येकाचा मार्ग सुलभ करते. विशाल रथावर आरूढ झालेली, महान आणि संपूर्ण विश्वाला प्रेरणा देणारी, उषादेवता दिवसाच्या सुरुवातीलाच आपले दिव्य तेज सर्वत्र प्रदान करते. ॥२॥

एषा गोभिररुणेभिर्युजानास्रेधन्ती रयिमप्रायु चक्रे ।
पथो रदन्ती सुविताय देवी पुरुष्टुता विश्ववारा वि भाति ॥३ ॥
आरक्त वर्णीय किरणांना जोडून घेणारी, आपल्या नियमांत कधीही न चुकणारी आणि प्रमाद न करता सतत ऐश्वर्य प्रदान करणारी उषादेवता सुखाचा मार्ग मोकळा करत प्रकट होत आहे. अनेकांद्वारे स्तुती केलेली आणि सर्वांना प्रिय असणारी उषादेवता प्रकाशित होत आहे. ॥३ ॥

एषा व्येनी भवति द्विबर्हा आविष्कृण्वाना तन्वं पुरस्तात् ।
ऋतस्य पन्थामन्वेति साधु प्रजानतीव न दिशो मिनाति ॥४ ॥
पूर्वेकडे स्वतःचे रूप दाखवणारी, अंधाराचा नाश करणारी, पृथ्वी आणि आकाश दोन्ही बाजूंनी वृद्धी पावणारी उषादेवता प्रकट झाली आहे. निसर्गाच्या नियमाचे अनुसरण करणारी, सगळी माहिती असणारी उषादेवता आपल्या मर्यादांचे कधीही उल्लंघन करत नाही. ॥४ ॥

एषा शुभ्रा न तन्वो विदानोर्ध्वेव स्नाती दृशये नो अस्थात् ।
अप द्वेषो बाधमाना तमांस्युषा दिवो दुहिता ज्योतिषागात् ॥५ ॥
स्नान करून सुंदर पांढरीशुभ्र रूपवती, सर्वांना दिसण्यासाठी सरळ उभी राहणारी, तेजस्वी उषादेवता प्रकट झाली आहे. आकाशाची कन्या उषादेवता अंधाराला आणि दुष्ट शक्तींना (द्वेषाला) दूर सारत आपल्या दिव्य प्रकाशासह प्रकट झाली आहे॥५ ॥

एषा प्रतीची दुहिता दिवो नृन्योषेव भद्रा नि रिणीते अप्सः ।
व्यूर्ण्वती दाशुषे वार्याणि पुनर्ज्योतिर्युवतिः पूर्वथाकः ॥६ ॥
आकाशाची कन्या, नित्य तरुण आणि कल्याणकारी उषादेवता, एखाद्या सुंदर नववधूप्रमाणे आपले सौंदर्य सर्व मानवांसमोर प्रकट करत आहे. रात्रीचा अंधार दूर करून संपूर्ण सृष्टीला प्रकाशमान करणारी उषादेवता सत्कर्म करणाऱ्या भक्तगणांसाठी धनाचा मार्ग मोकळा करते. उषादेवतेने नेहमीप्रमाणे पुन्हा एकदा जगतात प्रकाशाची निर्मिती केली आहे. ॥६ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-८१

ऋषि- श्यावाश्व आत्रेय **देवता** सविता **छन्द**- जगती

युञ्जते मन उत युञ्जते धियो विप्रा विप्रस्य बृहतो विपश्चितः ।
वि होत्रा दधे वयुनाविदेक इन्महो देवस्य सवितुः परिष्टुतिः ॥१॥
सर्वव्यापी, सर्वज्ञ आणि परम बुद्धिमान सवितादेवांच्या प्रार्थनेत सर्व ऋषीमुनी आपले मन एकाग्र करतात. सर्व काही जाणणारे सवितादेव यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञीय विधींचे योग्य व्यवस्थापन करतात. अशा सवितादेवांची स्तुती भव्य आहे ॥१॥

विश्वा रूपाणि प्रति मुञ्चते कविः प्रासावीद्भद्रं द्विपदे चतुष्पदे ।
वि नाकमख्यत्सविता वरेण्योऽनु प्रयाणमुषसो वि राजति ॥२॥
सर्वज्ञ आणि त्रिकालदर्शी असणारे सवितादेव विविध रूपे धारण करतात. सवितादेव मनुष्य आणि प्राणी या सर्वांचे कल्याण करतात. उषादेवतेच्या आगमनानंतर श्रेष्ठ आणि वंदनीय सवितादेव संपूर्ण विश्वाला आपल्या प्रकाशाने उजळून टाकतात. ॥२ ॥

यस्य प्रयाणमन्वन्य इद्ययुर्देवा देवस्य महिमानमोजसा ।
यः पार्थिवानि विममे स एतशो रजांसि देवः सविता महित्वना ॥३ ॥
ज्याच्या महान पराक्रमाचे आणि सामर्थ्याचे अनुकरण करत इतर सर्व देव ज्याच्या पाठीमागून चालतात, अशा वेगवान, सवितादेवाने आपल्या महानतेने पृथ्वीलोकाला आणि संपूर्ण अंतरिक्षलोकाला निर्माण केले आहे. ॥३ ॥

उत यासि सवितस्त्रीणि रोचनोत सूर्यस्य रश्मिभिः समुच्यसि ।
उत रात्रीमुभयतः परीयस उत मित्रो भवसि देव धर्मभिः ॥४॥
हे सवितादेवा! आपण तिन्ही प्रकाशमान लोकांमध्ये (स्वर्ग, अंतरिक्ष आणि पृथ्वीवर) प्रवास करता. आपण सूर्यदेवांच्या किरणांशी जोडले जाऊन सर्वत्र प्रकाश पसरवता . आपण रात्रीला दोन्ही बाजूंनी (संध्याकाळी आणि पहाटे) वेढून घेता. हे सवितादेवा! आपण सर्व नियमांचे पालन करत सर्वांचे मित्र बनता ॥४ ॥

उतेशिषे प्रसवस्य त्वमेक इदुत पूषा भवसि देव यामभिः ।
उतेदं विश्वं भुवनं वि राजसि श्यावाश्वस्ते सवित स्तोममानशे ॥५॥
हे सवितादेवा! या संपूर्ण जगाच्या उत्पत्तीवर आपण नियंत्रण ठेवता. आपल्या प्रवासाने आपण सर्वांचे पोषण करता म्हणून आपल्याला 'पूषन् देव' म्हणतात. या संपूर्ण विश्वावर आपण राज्य करता. हे सवितादेवा! श्यावाश्व ऋषी या स्तोत्राद्वारे आपलीच स्तुती करत आहेत ॥५ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-८२

ऋषि- श्यावाश्व आत्रेय **देवता** सविता **छन्द**- अनुष्टुप्

तत्सवितुर्वृणीमहे वयं देवस्य भोजनम् ।
श्रेष्ठं सर्वधातमं तुरं भगस्य धीमहि ॥१॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण, त्या प्रेरणा देणाऱ्या आणि दिव्य स्वरूप असलेल्या सवितादेवाच्या , सर्वांचे पालन-पोषण करणाऱ्या आणि पोषक शक्तीची याचना करतो आणि त्या, त्वरित फळ देणाऱ्या भगदेवांचे आम्ही ध्यान करतो.॥१॥

अस्य हि स्वयशस्तरं सवितुः कच्चन प्रियम् ।
न मिनन्ति स्वराज्यम् ॥२॥
स्वतःच्याच तेजाने अत्यंत प्रकाशमान असलेल्या या सवितादेवांच्या प्रिय नियमांचे आणि त्याच्या साम्राज्याचे (वैश्विक व्यवस्थेचे) कोणीही कधीही उल्लंघन करू शकत नाही किंवा ते नष्ट करू शकत नाही॥२॥

स हि रत्नानि दाशुषे सुवाति सविता भगः ।
तं भागं चित्रमीमहे ॥३॥
हे सवितादेवांनो आणि सौभाग्य देणाऱ्या भगदेवांनो ! आपण यज्ञकर्त्या भक्तगणांना उत्तम रत्न आणि धन प्रदान करता. आम्ही भक्तगण आपल्या अद्भुत आणि विविध प्रकारच्या सौभाग्याची प्रार्थना करत आहोत. ॥३ ॥

अद्या नो देव सवितः प्रजावत्सावीः सौभगम् ।
परा दुष्ष्वप्न्यं सुव ॥४॥

हे सवितादेवा ! आज आपण आम्हांला उत्तम पुत्र-पौत्र आणि ऐश्वर्याने युक्त असे सौभाग्य प्रदान करावे ही विनंती. आमची सर्व वाईट स्वप्ने, दुष्ट विचार व अमंगल गोष्टी आमच्यापासून दूर करून नष्ट कराव्यात ही विनंती. ॥४ ॥

विश्वानि देव सवितर्दुरितानि परा सुव । यद्भद्रं तन्न आ सुव ॥५॥
हे सवितादेवा! आपण आमच्यामधील सर्व दुर्गुण, दुःखे, पापे आणि संकटे दूर करावीत आणि जे आमच्यासाठी कल्याणकारी, शुभ आणि मंगलमय आहे, ते आम्हांला प्राप्त करून द्यावे ही विनंती.॥५ ॥

अनागसो अदितये देवस्य सवितुः सवे ।
विश्वा वामानि धीमहि ॥६॥
हे सवितादेवा ! आपल्या प्रेरणेने आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आदितीदेवींच्या दृष्टीने सर्व पापांपासून मुक्त होऊ आणि आम्हाला वैभव प्राप्त होवो ही विनंती ॥६ ॥

आ विश्वदेवं सत्पतिं सूक्तैरद्या वृणीमहे ।
सत्यसवं सवितारम् ॥७ ॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण सर्व देवांचे स्वरूप असलेल्या, सत्याचे पालन करणाऱ्या, सत्याची प्रेरणा देणाऱ्या सवितादेवांचे आवाहन करतो. ॥७ ॥

य इमे उभे अहनी पुर एत्यप्रयुच्छन् । स्वाधीर्देवः सविता ॥८ ॥

हे उत्तम बुद्धीने युक्त, दैदिप्यमान सवितादेवा ! आपण कोणत्याही प्रकारचा आळस न करता दिवस आणि रात्र या दोन्हीच्या आधी नियम पूर्वक प्रकट होता ॥८ ॥

य इमा विश्वा जातान्याश्रावयति श्लोकेन ।
प्र च सुवाति सविता ॥९ ॥
हे सवितादेवा ! आपण आपल्या ध्वनीने सर्व सजीव सृष्टीला जागे करता आणि कार्य करण्यासाठी प्रेरित करता ॥९ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-८३

ऋषि- अत्रि भौम **देवता** पर्जन्य **छन्द**- त्रिष्टुप् : २-४ जगती; ९ अनुष्टुप्

अच्छा वद तवसं गीर्भिराभिः स्तुहि पर्जन्यं नमसा विवास ।
कनिक्रदद्वृषभो जीरदानू रेतो दधात्योषधीषु गर्भम् ॥१॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! स्तुतियुक्त स्तोत्रांच्या पठणाने बलवान पर्जन्य देवांची उत्तम प्रकारे स्तुती करावी, आदराने नतमस्तक होऊन त्यांना प्रसन्न करावे. गर्जना करणारे, बलाढ्य वृषभा सरखे सामर्थ्यवान जीवन दाते पर्जन्यदेव वनस्पतींमध्ये गर्भाची स्थापना करतात ॥१॥

वि वृक्षान्हन्त्युत हन्ति रक्षसो विश्वं बिभाय भुवनं महावधात् ।
उतानागा ईषते वृष्ण्यावतो यत्पर्जन्यः स्तनयन्हन्ति दुष्कृतः ॥२॥
हे पर्जन्यदेवा!आपण ढगांचा प्रचंड गडगडाट करत दुष्टांचा नाश करता, तेव्हा चहुबाजूने वृक्षांना मोडून टाकता आणि राक्षसांनाही नष्ट करता. आपल्या त्या महाभयंकर शस्त्राच्या (विजेच्या आणि वादळाच्या) भयाने संपूर्ण सृष्टी थरथर कापते. आपल्या शक्तिशाली कोपापासून वाचण्यासाठी निष्पाप माणसेही भीतीने पळून जातात ॥२॥

रथीव कशयाश्वाँ अभिक्षिपन्नाविर्दूतान्कृणुते वर्ष्याँ अह ।
दूरात्सिंहस्य स्तनथा उदीरते यत्पर्जन्यः कृणुते वर्ष्यं नभः ॥३॥
हे पर्जन्यदेवा ! ज्याप्रमाणे एखादा रथी चाबकाने आपल्या घोड्यांना हाकतो, त्याप्रमाणे आपण पावसाचे दूत असणाऱ्या ढगांना हवेत प्रकट करता. जेव्हा आपण आकाशाला पावसाळी बनवता, तेव्हा दूरवरून सिंहाच्या गर्जनेसारखा ढगांचा गडगडाट ऐकू येऊ लागतो. ॥३॥

प्र वाता वान्ति पतयन्ति विद्युत उदोषधीर्जिहते पिन्वते स्वः ।
इरा विश्वस्मै भुवनाय जायते यत्पर्जन्यः पृथिवीं रेतसावति ॥४॥
हे पर्जन्यदेवा ! जेव्हा आपण आपल्या जलरूपी सामर्थ्याने पृथ्वीचे रक्षण करत तिला तृप्त करता, तेव्हा वारे वेगाने वाहू लागतात, विजा चमकतात, वनस्पतींचे अंकुर वर येतात, संपूर्ण वातावरण आनंदाने आणि समृद्धीने भरून जाते आणि अन्नधान्य निर्माण होते ॥४॥

यस्य व्रते पृथिवी नन्नमीति यस्य व्रते शफवज्जर्भुरीति ।
यस्य व्रत ओषधीर्विश्वरूपाः स नः पर्जन्य महि शर्म यच्छ ॥५॥
हे पर्जन्यदेवा ! आपल्या कृपेमुळे विशाल पृथ्वी नम्र होते, खूर असलेले सर्व पशु आनंदाने उड्या मारू लागतात, सर्व प्रकारच्या वनस्पती विविध रूपांत बहरून उठतात. आपण आम्हाला महान सुख आणि संरक्षण प्रदान करावे ही विनंती. ॥५ ॥

दिवो नो वृष्टिं मरुतो ररीध्वं प्र पिन्वत वृष्णो अश्वस्य धाराः ।
अर्वाङेतेन स्तनयित्नुनेह्यपो निषिञ्चन्नसुरः पिता नः ॥६॥
हे मरुद्गणांनो ! आम्हा भक्तगणांसाठी आकाशातून पावसाचा वर्षाव करावा. आपल्या सामर्थ्यशाली पावसाच्या ढगातून जलधारा वाहून द्याव्यात ही विनंती. सृष्टीला जीवन देणाऱ्या, पालनकर्त्या पित्या सारख्या हे पर्जन्यदेवा ! गर्जना करणाऱ्या मेघांसह आपण आमच्या दिशेने खाली यावे आणि पाण्याचा वर्षाव करावा ही विनंती ॥६ ॥

अभि क्रन्द स्तनय गर्भमा धा उदन्वता परि दीया रथेन ।
दृतिं सु कर्ष विषितं न्यञ्चं समा भवन्तूद्वतो निपादाः ॥७ ॥

हे पर्जन्यदेवा ! आपण गर्जना आणि गडगडाट करत, पाण्याने भरलेल्या रथातून आकाशात फिरावे, पाण्याने भरलेल्या दगडाला किंवा पिशवीला मुक्त करून वर्षाव करावा ही विनंती. त्यामुळे उंच आणि खोल भाग एक सामान होतील ॥७ ॥

महान्तं कोशमुदचा नि षिञ्च स्यन्दन्तां कुल्या विषिताः पुरस्तात्।
घृतेन द्यावापृथिवी व्युन्धि सुप्रपाणं भवत्वघ्न्याभ्यः ॥८ ॥
हे पर्जन्यदेवा ! आपण पाण्याचा ढगरुपी घडा उचलून रिकामा करावा. सर्व बाजूंनी मुक्त झालेले पाण्याचे ओढे आणि नद्या वेगाने प्रवाहित कराव्यात ही विनंती. आकाश आणि पृथ्वीला तृप्त करावे, गायींसाठी पिण्यायोग्य पाणी प्रदान करावे विनंती. ॥८ ॥

यत्पर्जन्य कनिक्रदत्स्तनयन्हंसि दुष्कृतः ।
प्रतीदं विश्वं मोदते यत्किं च पृथिव्यामधि ॥९ ॥
हे पर्जन्यदेवा ! जेव्हा आपण विजांच्या कडकडाटासह जोरदार गर्जना करत दुष्कृत्य करणाऱ्यांचा नाश करता ,तेव्हा या पृथ्वीवर जे काही अस्तित्वात आहे, ते सर्व सजीव आणि संपूर्ण जग आनंदाने डोलू लागते॥९ ॥

अवर्षीर्वर्षमुदु षू गृभायाकर्धन्वान्यत्येतवा उ ।
अजीजन ओषधीर्भोजनाय कमुत प्रजाभ्योऽविदो मनीषाम्॥१०॥
हे पर्जन्यदेवा ! आपण पावसाचा वर्षाव केला ते स्वीकारायला लावले, वाळवंटी प्रदेशांना सुपीक आणि हिरवेगार बनवून टाकले , प्राणी मात्रांच्या भोजनासाठी औषधि, वनस्पती, अन्नधान्य उत्पन्न केले आणि सर्वांना समृद्धीची प्रेरणा दिली ॥१० ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-८४

ऋषि- अत्रि भौम **देवता** पृथ्वी **छन्द**- अनुष्टुप्

बळित्था पर्वतानां खिद्रं बिभर्षि पृथिवि ।
प्र या भूमिं प्रवत्वति मह्ना जिनोषि महिनि ॥१॥
हे धारणीमाते ! आपण खरोखरच पर्वतांचा प्रचंड भार अत्यंत सहजतेने धारण करता . हे धारणीमाते! आपण उतारांवरून नद्यांना वाहत्या करून संपूर्ण सृष्टीला जीवन आणि समृद्धी प्रदान करता ॥१॥

स्तोमासस्त्वा विचारिणि प्रति ष्टोभन्त्यक्तुभिः ।
प्र या वाजं न हेषन्तं पेरुमस्यस्यर्जुनि॥२॥
हे विविध रूपात विचरण करणाऱ्या धारणीमाते ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण सर्वकाळ स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करून आपला जयजयकार करत आहोत. वेगवान अश्व ज्याप्रमाणे खिंकाळत असतो त्याप्रमाणे आपण गर्जना करणाऱ्या ढगातून पाऊस पाडता. ॥२ ॥

दृळ्हा चिद्या वनस्पतीन्क्ष्मया दर्धर्ष्योजसा ।
यत्ते अभ्रस्य विद्युतो दिवो वर्षन्ति वृष्टयः ॥३॥
हे दृढ धारणीमाते ! जेव्हा विजेच्या कडकडाटासह पावसाच्या धारा बरसतात तेव्हा आपण आपल्या अंगभूत सामर्थ्याने पाण्याला झेलून वनस्पतींचा सांभाळ करता ॥३ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-८५

ऋषि- अत्रि भौम **देवता** वरुण **छन्द**- त्रिष्टुप्

प्र सम्राजे बृहदर्चा गभीरं ब्रह्म प्रियं वरुणाय श्रुताय ।
वि यो जघान शमितेव चर्मोपस्तिरे पृथिवीं सूर्याय ॥१॥
हे अत्रीऋषि ! महान सम्राट आणि सर्वत्र प्रसिद्ध असलेल्या वरुणदेवांसाठी तुम्ही गंभीर आणि वरुणदेवांना प्रिय असणाऱ्या स्तुतियुक्त स्तोत्रांचे गायन करावे. ज्याप्रमाणे कसाई मेलेल्या जनावराची कातडी ताणतो, त्याचप्रमाणे वरुणदेव सूर्यदेवांना प्रवास करण्यासाठी अवकाश विस्तारतात .॥१॥

वनेषु व्यन्तरिक्षं ततान वाजमर्वत्सु पय उस्रियासु ।
हृत्सु क्रतुं वरुणो अप्स्वग्निं दिवि सूर्यमदधात्सोममद्रौ ॥२॥
हे वरुणदेवा! आपण वनामध्ये आकाशाचा विस्तार, वेगाने धावणाऱ्या अश्वांमध्ये शक्ती, गायींमध्ये दूध, मनुष्यांच्या हृदयामध्ये संकल्प शक्ती, पाण्यामध्ये अग्निदेव, आकाशलोकात सूर्यदेव आणि पर्वतांवर सोमरस प्रस्थापित केला आहे॥२॥

नीचीनबारं वरुणः कवन्धं प्र ससर्ज रोदसी अन्तरिक्षम् ।
तेन विश्वस्य भुवनस्य राजा यवं न वृष्टिर्व्युनत्ति भूम ॥३॥
हे वरुणदेवा ! आपण पृथ्वी, स्वर्ग आणि अंतरिक्षात खाली मुख केलेला पाण्याच्या मेघाला मुक्त केले. हे संपूर्ण विश्वाचे राजे वरुणदेवा ! ज्याप्रमाणे पाऊस धान्याच्या पिकाला ओले करतो, त्याचप्रमाणे आपण पाण्याने संपूर्ण पृथ्वीला ओले करता ॥३ ॥

उनत्ति भूमिं पृथिवीमुत द्यां यदा दुग्धं वरुणो वष्ट्यादित् ।
समभ्रेण वसत पर्वतासस्तविषीयन्तः श्रथयन्त वीराः ॥४॥
हे वरुणदेवा ! आपण आपल्या इच्छेनुसार आकाश, पृथ्वी आणि सर्व भूमि, वृष्टी करून ओली करता, त्या वेळी स्वतःचे बळ प्रकट करणारे पर्वत ढगांनी झाकले जातात आणि पराक्रमी मेघ पाणी सोडून शांत होतात.॥४ ॥

इमामू ष्वासुरस्य श्रुतस्य महीं मायां वरुणस्य प्र वोचम् ।
मानेनेव तस्थिवाँ अन्तरिक्षे वि यो ममे पृथिवीं सूर्येण ॥५॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण सर्व जगाचे रक्षण करणाऱ्या आणि सर्वत्र प्रसिद्ध असलेल्या वरुणदेवांच्या महान शक्तीचे मनःपूर्वक वर्णन करतो. वरुणदेवांनी आकाशात राहून एखाद्या मोजपट्टीने मोजावे त्याप्रमाणे सूर्यदेवांच्या सहाय्याने या संपूर्ण पृथ्वीला अचूक मोजले ॥५ ॥

इमामू नु कवितमस्य मायां महीं देवस्य नकिरा दधर्ष ।
एकं यदुद्ना न पृणन्त्येनीरासिञ्चन्तीरवनयः समुद्रम् ॥६ ॥
हे वरुणदेवा ! आपल्या भूत, वर्तमान आणि भविष्य काळाचे ज्ञान असलेल्या शक्तीला कोणीही आव्हान देऊ शकत नाही. ज्या प्रमाणे सतत पाणी ओतणाऱ्या नद्या समुद्राला मिळत असूनही समुद्र पूर्णपणे भरू शकत नाही त्याप्रमाणे आहे आपली शक्ती पूर्णपणे ओळखणे कठीण आहे ॥६॥

अर्यम्यं वरुण मित्र्यं वा सखायं वा सदमिद्भ्रातरं वा ।
वेशं वा नित्यं वरुणारणं वा यत्सीमागश्चकृमा शिश्रथस्तत् ॥७॥

हे वरुणदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचा सोबत राहणाऱ्या, भावाशी, मित्राशी, सहकाऱ्यांशी, शेजाऱ्यांशी, एखाद्या अनोळखी व्यक्तीशी, नकळत जो काही अपराध झाला असेल, कृपा करून आम्हाला त्या सर्व पापांमधून मुक्त करावे आणि आम्हांला क्षमा करावे ही विनंती . ॥७ ॥

कितवासो यद्रिरिपुर्न दीवि यद्वा घा सत्यमुत यन्न विद्म ।
सर्वा ता वि ष्य शिथिरेव देवाधा ते स्याम वरुण प्रियासः ॥८ ॥
हे वरुणदेवा ! एखाद्या जुगारी माणसाकडून जसे नकळत अपराध घडतात, तसेच आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांकडून प्रत्यक्ष, जाणूनबुजून किंवा आमच्या नकळत जी काही पापे घडली असतील, त्या सर्व पापांमधून, एखाद्या सैल केलेल्या दोरी मधून बंध मुक्त होता येते त्याप्रमाणे आम्हाला त्यातून मुक्त करावे आणि आम्ही आपले प्रिय भक्त व्हावे ही विनंती. ॥८ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-८६

ऋषि- अत्रि भौम **देवता** – इंद्र आणि अग्नि **छन्द**- अनुष्टुप् ६ विराट् पूर्वा

इन्द्राग्नी यमवथ उभा वाजेषु मर्त्यम् ।
दृळ्हा चित्स प्र भेदति द्युम्ना वाणीरिव त्रितः ॥१॥
हे इंद्रदेवा आणि अग्निदेवा ! आपण ज्या मर्त्य यज्ञकर्त्या भक्तगणांचे संकट समयी रक्षण करता तो भक्त शत्रूंचे मजबूत किल्ले सहजपणे भेदून टाकतो. त्रितऋषींप्रमाणे तो भक्तगण यश संपादन करतो ॥१॥

या पृतनासु दुष्टरा या वाजेषु श्रवाय्या ।
या पञ्च चर्षणीरभीन्द्राग्नी ता हवामहे ॥२॥
युद्धामध्ये अजिंक्य, ऐश्वर्य मिळवणाऱ्या कीर्ती मिळवणाऱ्या, संपूर्ण मानव जातीवर अधिराज्य करणाऱ्या हे इंद्रदेवा आणि अग्निदेवा ! आम्ही भक्तगण आमच्या रक्षणासाठी आपले आवाहन करतो ॥२ ॥.

तयोरिदमवच्छवस्तिग्मा दिद्युन्मघोनोः ।
प्रति द्रुणा गभस्त्योर्गवां वृत्रघ्न एषते ॥३॥
शत्रूचा पराभव करण्यास अफाट समर्थ असलेल्या हे इंद्रदेवा आणि अग्निदेवा ! आपण दोघे वृत्रासुराचा नाश करून गायींना सोडवण्यासाठी एकत्र जाता तेव्हा आपल्या हातामध्ये तीक्ष्ण, चमकणारे वज्र शोभून दिसते. ॥३ ॥

ता वामेषे रथानामिन्द्राग्नी हवामहे ।
पती तुरस्य राधसो विद्वांसा गिर्वणस्तमा ॥४ ॥

स्तुतियुक्त स्तोत्रांनी प्रसन्न होणाऱ्या, शीघ्रतेने ऐश्वर्य प्रदान करणाऱ्या हे इंद्रदेवा आणि अग्निदेवा ! आम्ही भक्तगण युद्धामध्ये आपल्या गतिमान रथाला घेऊन येण्याचे आवाहन करतो ॥४ ॥

ता वृधन्तावनु द्यून्मर्ताय देवावदभा ।
अर्हन्ता चित्पुरो दधेंऽशेव देवावर्वते ॥५॥
सतत मर्त्य मानवांना सामर्थ्य देणाऱ्या, कोणाही कडून पराभूत न होणाऱ्या हे इंद्रदेवा आणि अग्निदेवा ! आम्ही भक्तगण यज्ञातील प्रसाद म्हणून आपल्याकडे आश्वासारख्या शक्तीचे वरदान मागतो ॥५ ॥

एवेन्द्राग्निभ्यामहावि हव्यं शूष्यं घृतं न पूतमद्रिभिः ।
ता सूरिषु श्रवो बृहद्रयिं गृणत्सु दिधृतमिषं गृणत्सु दिधृतम् ॥६॥
हे इंद्रदेवा आणि अग्निदेवा ! सोमरस सिद्ध करणाऱ्या पाषाणांद्वारे पवित्र केलेले, शुद्ध तुपाने सामर्थ्य देणारे हविष्यान्नाची आहुती यज्ञामध्ये समर्पित केली आहे. हे देवांनो ! आम्हाला, ज्ञानी यज्ञकर्त्या भक्तगणांना, महान कीर्ती, अपार धन-ऐश्वर्य आणि उत्तम अन्न प्रदान करावे ही विनंती. ॥६ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-८७

ऋषि- अत्रि भौम **देवता** – मरुद्गण **छन्द**-जगती

प्र वो महे मतयो यन्तु विष्णवे मरुत्वते गिरिजा एवयामरुत् ।
प्र शर्धाय प्रयज्यवे सुखादये तवसे भन्ददिष्टये धुनिव्रताय शवसे ॥१॥

विष्णुदेवांच्या महानतेचा आणि मरुद्गणांच्या वेगाचा अनुभव असलेल्या एवयामरुत् ऋषींच्या विचारातून उत्पन्न झालेली स्तुती, महान, शक्तिशाली, यज्ञास पात्र, सुंदर अलंकारांनी युक्त, गर्जना करणाऱ्या, शत्रूंचा थरकाप उडवणाऱ्या, मरुद्गणांना आणि विष्णूदेवांना समर्पित केली आहे. ॥१॥

एवयामरुत् हा संस्कृत शब्द ऋग्वेदात आढळणारा एक अत्यंत महत्त्वाचा वैदिक शब्द आहे स्वतःच्याच वेगाने आणि गतीने सतत गतिमान असणारी शक्ति किंवा एवयामरुत् नावाचे ऋषि

प्र ये जाता महिना ये च नु स्वयं प्र विद्मना ब्रुवत एवयामरुत् ।
क्रत्वा तद्वो मरुतो नाधृषे शवो दाना मह्ना तदेषामधृष्टासो नाद्रयः ॥२॥

आपल्या महान सामर्थ्याने प्रकट झालेले (महिना), प्रगल्भ ज्ञानामुळे महान असलेले (प्र विद्मना), अत्यंत वेगवान गतीने चालणाऱ्या हे (एवयामरुत्) मरुद्गणांनो ! आपल्या संकल्प शक्तीमुळे आपला पराक्रम कोणालाही जिंकता येण्यासारखा नाही. (तदेषामधृष्टासो) आपले औदार्य न डगमगणाऱ्या पर्वताप्रमाणे अढळ आहे ॥२ ॥

प्र ये दिवो बृहतः शृण्विरे गिरा सुशुक्वानः सुभ्व एवयामरुत् ।
न येषामिरी सधस्थ ईष्ट आँ अग्नयो न स्वविद्युतः प्र स्यन्द्रासो धुनीनाम् ॥३॥

हे तेजस्वी, अत्यंत वेगवान गतीने चालणाऱ्या हे (एवयामरुत्) मरुद्गणांनो ! आपल्या महान गर्जना (किंवा स्तुतीने) आकाशातून सर्वत्र ऐकू येतात. आपल्यावर नियंत्रण ठेवणारा कोणीही नाही. आपण तेजाने चमकणाऱ्या विजेप्रमाणे आणि प्रदीप्त अग्निदेवांप्रमाणे, गर्जना करणाऱ्या नद्यांप्रमाणे गतिमान आहात. ॥३॥

स चक्रमे महतो निरुरुक्रमः समानस्मात्सदस एवयामरुत् ।
यदायुक्त त्मना स्वादधि ष्णुभिर्विष्पर्धसो विमहसो जिगाति शेवृधो नृभिः ॥४॥

हे पराक्रमी, विस्तीर्ण पावले टाकणारे (निरुरुक्र) मरुद्गणांनो! आपण एकाच उगम स्थानातून (समानस्मात्) बाहेर पडता. अत्यंत वेगवान गतीने चालणाऱ्या हे (एवयामरुत्) मरुद्गणांनो ! आपण स्वतःच्या सामर्थ्यावर सज्ज होऊन पर्वतांच्या उंच शिखरावरून मार्गक्रमण करता. आपण भक्तगणांचे कल्याण करणारे आणि समृद्धी वाढवणारे आहात. ॥४॥

स्वनो न वोऽमवान्रेजयद्वृषा त्वेषो ययिस्तविष एवयामरुत् ।
येना सहन्त ऋञ्जत स्वरोचिषः स्थारश्मानो हिरण्ययाः स्वायुधास इष्मिणः ॥५॥

हे स्वयंप्रकाशी, सोन्याचे अलंकार धारण केलेल्या , उत्तम शस्त्रे धारण केलेल्या आणि आपल्या तीव्र गतीने चालणाऱ्या मरुद्गणांनो ! आपला गर्जना करणारा आवाज शत्रूंना थरथर कंपवतो आणि पराभूत करतो.

आपण वृष्टी करणारे, सत्याच्या मार्गाने मार्गक्रमण करणारे आहात. ॥५॥

अपारो वो महिमा वृद्धशवसस्त्वेषं शवोऽवत्वेवयामरुत् ।
स्थातारो हि प्रसितौ संदृशि स्थन ते न उरुष्यता निदः शुशुक्वांसो नाग्नयः ॥६॥

हे कीर्तीमान, तीव्र गतीने चालणाऱ्या मरुद्गणांनो ! आपला महिमा अमर्याद आहे. आपल्या तेजस्वी आणि दिव्यबळाने आम्हा भक्तगणांचे रक्षण करावे ही विनंती. संपूर्ण जग नियंत्रणात आणि दृष्टिपथात स्थिर ठेवणाऱ्या, दैदिप्यमान अग्निदेवांप्रमाणे प्रदीप, हे मरुद्गणांनो ! आपण आम्हांला संकटांपासून मुक्त करावे आणि आमचे रक्षण करावे ही विनंती. ॥६ ॥

ते रुद्रासः सुमखा अग्नयो यथा तुविद्युम्ना अवन्त्वेवयामरुत् ।
दीर्घं पृथु पप्रथे सद्म पार्थिवं येषामज्मेष्वा महः
शर्धांस्यद्भुतैनसाम् ॥७॥

हे तीव्र गतीने चालणाऱ्या, अग्निदेवांसारखे तेजस्वी, बलाढ्य, निर्दोष आणि ऐश्वर्यसंपन्न रुद्रपुत्र मरुद्गणांनो ! आपण आमचे रक्षण करावे ही विनंती . आपल्या युद्धाच्या प्रवासात आपली प्रचंड सैन्ये एकत्र आली आणि आपल्या पराक्रमामुळे भक्तगणांची विशाल निवासस्थाने अधिकच विस्तारित झाली. ॥७ ॥

अद्वेषो नो मरुतो गातुमेतन श्रोता हवं जरितुरेवयामरुत् ।
विष्णोर्महः समन्यवो युयोतन स्मद्रथ्यो न दंसनाप द्वेषांसि सनुतः ॥८॥

हे द्वेषरहित, प्रगतीचा मार्ग दाखवणाऱ्या, तीव्र गतीने चालणाऱ्या मरुद्गणांनो ! आपण आम्हा स्तुती करणाऱ्या भक्तांची प्रार्थना ऐकावी ही विनंती. समान उत्साही, उत्तम रथारूढ मरुद्गणांनो ! आपण सर्वव्यापी विष्णुदेवांप्रमाणे महान आहात. आपण आपल्या दिव्यकर्मांनी आमच्या, आतील आणि बाहेरील सर्व दुष्ट प्रवृत्तींचा नाश करावा ही विनंती ॥८ ॥

गन्ता नो यज्ञं यज्ञियाः सुशमि श्रोता हवमरक्ष एवयामरुत् ।
ज्येष्ठासो न पर्वतासो व्योमनि यूयं तस्य प्रचेतसः स्यात दुर्धर्तवो निदः ॥९॥

यज्ञास पात्र आणि अंतराळात पर्वतांप्रमाणे अचल हे मरुद्गणांनो! आपण शांत चित्ताने आमच्या या यज्ञामध्ये यावे . अजिंक्य,तीव्र गतीने चालणाऱ्या, ज्ञानी हे मरुद्गणांनो ! आपण आम्हा भक्तगणांचे आवाहन ऐकावे. आम्हांला निंदकांपासून दूर ठेवावे आणि आमचे रक्षण करावे ही विनंती . ॥९ ॥

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे एकोणिसावे वर्ष आहे. प्रा श्रीपाद काळे यांचे हे ई साहित्यवरचे अठरावे पुस्तक आहे.

प्रा श्रीपाद काळे हे विज्ञानाचे प्राध्यापक. मुंबईतील विख्यात विल्सन कॉलेजमधे त्यांनी विज्ञान शिकवले. तसेच मुंबईतील स्वा. सावरकर स्मारकामधे विविध उपक्रमांमधे ते कार्यरत आहेत. ऋग्वेद हे त्यांचे पहिलेच प्रकाशित पुस्तक.

प्रा श्रीपाद काळे यांच्यासारखे काही थोडे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), **डॉ. नितीन मोरे (६६ पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (३), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (२३), मधू शिरगांवकर (८), **अशोक कोठारे (१०००० पानी महाभारत)**, **श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ)**, मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता

देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), **डॉ. वृषाली जोशी- जागतिक वाङ्मय अनुवाद (६६ पुस्तके)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४०), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१५), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), **आसावरी काकडे** (१४), **श्याम कुलकर्णी -मूळ वाल्मिकी रामायण(३४)**, किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (८), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, **डॉ. सरोज सहस्रबुद्धे- वैद्यक विज्ञान(२२),** अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम(११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक(३), श्रीराम काळे (८), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी(४), रामकृष्ण बाक्रे(३), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत(२), अशोक बेंडखळे(५), सुहास साने, सुवर्णा लेले, **प्राचार्य शशिकांत कर्डेकर**(२७ भूगोल विज्ञान

विषयक), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(४), कैलास बडगुजर, **श्रीपाद काळे- समग्र ऋग्वेद(१८)**, वैभव पाटील, चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक(२), प्रमोद नाईकवाडे, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, मनोहर सुरवाडे(३), श्रेणिक सारडे (६), दिलिप ठाकूर, धनंजय कुलकर्णी, मिलिंद चौधरी, जोसेफ तुस्कानो, सुभाष धारणकर, सचिन कुल्ली(३), विश्वनाथ मानकर, अर्चना सहस्रबुद्धे असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'ई'यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव Whatsapp करा)





आधीचे मंडल
वाचण्यासाठी
इथे क्लिक करा